06-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SKK/ 10:45

06-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SKK/ SBT/ KTG/

10:45

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**अर्धातास चर्चा**

**पृ. शी.** : शासकीय संस्थांच्या भाडेपट्टीवर दिलेल्या मालमत्तांचे नुतनीकरण करताना मुद्रांक शुल्कात केलेली भरमसाठ वाढ.

**मु. शी.** : शासकीय संस्थांच्या भाडेपट्टीवर दिलेल्या मालमत्तांचे नुतनीकरण करताना मुद्रांक शुल्कात केलेली भरमसाठ वाढ यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य श्री.राज तेली,वि.प.स. यां-ी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

**पृ. शी.** : उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंध,अपंगांची विशेष भरती सुरू करणे.

**मु. शी.** : उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंध,अपंगांची विशेष भरती सुरू करणे, यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्य श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

**पृ.शी.** : राज्यातील अनुदानित खाजगी उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूतपेक्षा वाढीव शिक्षक पदांना नेमणुकीच्या दिनांकापासून वेतन अमान्य केल्यामुळे शिक्षकांचे झालेले नुकसान.

मु.शी. राज्यातील अनुदानित खाजगी उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूतपेक्षा वाढीव शिक्षक पदांना नेमणुकीच्या दिनांकापासून वेतन अमान्य केल्यामुळे शिक्षकांचे झालेले नुकसान याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली

अर्धातास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील अनुदानित खाजगी उच्च माध्यमिक शाळांमधील पायाभूतपेक्षा वाढीव शिक्षक पदांना शासनाने दिनांक 9 ऑक्टोबर, 2006 च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिली असून हे सर्व शिक्षक (सुमारे 511) सन 2003-04 व 2004-05 पासून सेवेत असूनही नेमणुकीच्या दिनांकापासून वेतन अमान्य करून सप्टेंबर 2006 पासून वेतन मंजूर केल्याने सन 2003-04 मधील 193 शिक्षकांचे 38 महिन्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच सन 2004-05 मधील 318 शिक्षकांचे 26 महिन्यांचे वेतन नाकारणे संबंधित शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून प्रत्यक्ष काम केले असल्याने वेतन मिळण्याची आवश्यकता व त्यावर शासनाची प्रतिक्रिया व उपाययोजना."

सभापती महोदय, राज्यातील अनुदानित खाजगी उच्च माध्यमिक शाळांमधील सन 2003-04, 2004-05 या वर्षातील वाढीव शिक्षकांच्या पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. तेव्हापासून दोन वर्षाच्या पगार देण्याच्या संदर्भातील विषय आहे. या संदर्भातील विषय दिनांक 5-4-2000 रोजी सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळेस शासनाने उत्तर दिलेले आहे की , 2003-04 साठी 238 पदे आणि 2004-05 मधील 331 शिक्षकांची पदे अशी एकूण 569 वाढीव पदांना मान्यता देण्याच्या संदर्भातील प्रस्ताव आलेला होता. सन 2003-04 साठी वित्त विभागाकडून 1 कोटी 23 लाख 90 हजार रुपयाची आर्थिक तरतूद होणे आवश्यक होते, असे म्हटलेले होते. त्यानंतर 2004-05 मधील शिक्षकांची 331 पदांसाठी 1 कोटी 65 लाख 20



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

10:45

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरू....

हजाराची तरतूद वित्त विभागाकडून होणे आवश्यक आहे. जोपर्यन्त वित्त विभागाकडून मंजुरी मिळत नाही, तोपर्यन्त या पदांना प्रशासकीय मान्यता देऊ शकत नाही, असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले होते. एकूण 569 पदांची स्क्रुटीनी होऊन वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला होता. त्याचा पाठपुरावा केल्यानंतर पदांच्या मान्यतेच्या संदर्भातील आदेश 9 सप्टेंबर 2006 रोजी निघाला.शासनाच्या आदेशाप्रमाणे सन 2003-04 आणि 2004-05 मधील एकूण 238 पदांच्या संदर्भातील प्रस्ताव आलेला आहे. त्या संदर्भाने शासनाने उत्तर दिलेले आहे की, या संदर्भातील वित्त विभागाकडून निधीची उपलब्धता करून घेता, त्यापैकी फक्त 193 पदांनाच मान्यता दिलेली आहे आणि जवळजवळ 45 पदे व्यपगत करण्यात आलेली आहेत. सन 2004-05 मध्ये 331 पदांचा प्रस्ताव पाठविलेला होता, त्यापैकी 211 पदे मंजूर झाली. म्हणजे यामधील 13 पदे कमी करण्यात आली. शिक्षकांची एकूण 569 पदे मान्य करण्यात आली होती, त्यापैकी 58 पदे कमी केली आणि 511 पदांना मान्यता दिलेली आहे. ही 58 शिक्षकांची पदे कमी केली, या संदर्भात माझा आक्षेप आहे. या पदांना 38-39 महिन्यांनी मान्यता दिली. जे शिक्षक कमी केले आहेत ते सर्व अनुदानित शाळेमध्ये काम करतात. या शिक्षकांना पगार देण्याची शासनाची जबाबदारी आहे. अनुदानित शाळांचे म्हणणे आहे की, शासनाने विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे आणि कार्यभाराच्या आधारावर वाढीव पदांना मान्यता दिलेली होती. नंतर 511 पदांनाच मान्यता मिळालेली आहे. सन 2003-04 पासून जवळजवळ 138 शिक्षक काम करीत आहेत..

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

सन 2004-05 पासून काम करणाऱ्या आणि मान्यता मिळालेल्या शिक्षकांची संख्या 211 आहे. एकूण 349 पूर्णवेळ आणि 162 अर्धवेळ शिक्षक आहेत. एकूण 511 पदांना शासनाने मान्यता दिलेली आहे. हे शिक्षक 38-39 महिन्यांपासून काम करीत आहेत. परंतु शासनाने आता जे मान्यतेचे आदेश काढले त्यामध्ये पगाराची जी तरतूद केलेली आहे त्यानुसार सप्टेंबर, 2006 पासून पुढचे वेतन मिळेल. याचा अर्थ सन 2003-04 आणि 2004-05 पासून काम करणारे जे शिक्षक आहेत त्यामधील सन 2003-04 मधील शिक्षकांना 38 महिन्यांचे वेतन नाकारलेले आहे आणि सन 2004-05 मधील जे शिक्षक आहेत त्यांचे 28 महिन्यांचे वेतन नाकारलेले आहे. त्यांनी काम केलेले आहे पण त्यांना वेतन मिळालेले नाही. त्या अनुदानित संस्था असल्यामुळे संस्था चालक पगार देण्यास तयार नाहीत. सन 2003-04 आणि 2004-05 मध्ये काम केलेल्या अशा शिक्षकांचे पेन्शनच्या बाबतीत नुकसान होणार आहे. 2003-04 मधील शिक्षकांना 38 महिन्यांचे आणि 2004-05 मधील शिक्षकांना 28 महिन्यांचे वेतन नाकारलेले आहे. यामध्ये शिक्षकांचा कोणताही दोष नाही. त्यांच्या नेमणुका नियमित स्वरुपामध्ये झालेल्या आहेत. त्यांना मान्यता मिळालेली आहे. केवळ तांत्रिक अडचणीमुळे म्हणजे प्रशासकीय मान्यता मिळालेली नव्हती म्हणून त्यांना वेतन मिळालेले नाही. त्यांना शासनाने उशिरा मान्यता दिली. यामध्ये शिक्षकांचा दोष नाही. संबंधित विभागाने आदेश काढलेले आहेत. पायाभूतपेक्षा जी वाढीव पदे होती त्या पदांच्या संदर्भात ऑक्टोबर, 2003 मध्ये प्रस्ताव शासनाकडे यावयास पाहिजे होता. हा प्रस्ताव जर ऑक्टोबर, 2003 मध्ये शासनाकडे आला असता आणि शासनाने तातडीने मान्यता दिली असती तर त्या शिक्षकांना तातडीने वेतन मिळू शकले असते. एक तर संबंधित कार्यालयाकडून प्रस्ताव उशिरा आला. त्यामुळे शासनाने उशिरा म्हणजे 40 महिन्यानंतर मान्यता दिली. केवळ प्रशासकीय मान्यता उशिरा दिली या एका तांत्रिक मुद्याच्या आधारे या सर्व शिक्षकांचे वेतन नाकारलेले आहे. शासनाने 511 शिक्षकांना मान्यता दिलेली आहे. त्या शिक्षकांनी काम केलेले आहे. या शिक्षकांना वेतन मिळावे अशी अपेक्षा आहे. किंबहुना हा त्यांचा हक्क आहे आणि हा हक्क शासनाला डावलता येणार नाही. मागच्यावेळी मी याबाबत सांगितले होते. शासनाने त्यांना उशिरा मान्यता दिली. तीन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

वर्षापासून आमच्या शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. शासनाने हे प्रकरण प्रलंबित ठेवलेले आहे. शासनाने असे उत्तर दिले की, अन्याय केलेला नाही परंतु हा अन्याय झालेला आहे. या शिक्षकांच्या तीन वर्षाच्या वेतनाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, यासंदर्भात आपणही आम्हाला मदत करावी आणि या शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा अशी मी विनंती करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, पायाभूत पेक्षा वाढीव शिक्षक पदांना जी सप्टेंबर, 2006 पासून मान्यता देण्यात आली आहे त्यांना अधीचे वेतन दिले पाहिजे. त्यांच्या 40 महिन्यांच्या वेतनाचा प्रश्न आहे. हे खरोखर आमच्या शिक्षकांचे आर्थिक नुकसान आहे. त्यांच्यावर हा अन्याय झालेला आहे. ज्या शिक्षकांनी ज्ञानदानाचे काम केलेले आहे. अशा शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे योग्य वाटत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांनी ज्या पध्दतीने अपेक्षा व्यक्त केली त्याप्रमाणे या शिक्षकांना पगार दिला पाहिजे. यासंदर्भात योग्य तो निर्णय झाला पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने त्यांना न्याय देऊ शकू आणि त्यांचे जे आर्थिक नुकसान होणार आहे ते होणार नाही. कारण भविष्यामध्ये या बाबीचे परिणाम होणार आहेत. जे शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करीत आहेत त्यांच्या बाबतीत निर्णय व्हावा. दुसरे म्हणजे ज्या 58 पदांचा प्रश्न आहे तो देखील सोडविण्यात यावा आणि त्यांना देखील मान्यता मिळावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

----

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. ज्यावेळी नैसर्गिक वाढी नुसार पदे निर्माण होतात त्यावेळी त्यांना मान्यता देण्याची आवश्यकता असते. परंतु असे न करता लालफितीच्या कारभारामुळे, प्रशासकीय दिरंगाईमुळे प्रस्ताव वर्षानुवर्षे पडून राहातात आणि परिणामी शिक्षकांवर अन्याय होतो. जवळपास 193 शिक्षकांना 38 महिन्यांचा पगार मिळालेला नाही. तसेच 2004-05 मधील शिक्षकांना 28 महिन्याचा पगार मिळालेला नाही. ज्या दिवसापासून नैसर्गिक वाढी नुसार शिक्षकांची नियुक्ती होते त्या दिवसापासून त्या शिक्षकांना पगार मिळणे आवश्यक आहे. ज्या दिवसापासून शिक्षकाची नियुक्ती होईल त्या दिवसापासून ते शिक्षकाचे पद ग्राह्य धरुन त्याला नियमित वेतन मिळेल अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला पाहिजे. प्रशासकीय दिरंगाईमुळे शिक्षकांना पगार दिला जात नसल्यामुळे त्याचा परिणाम पुढे त्यांच्या पेन्शनवर होतो. म्हणून ज्या दिवसापासून शिक्षकाची नेमणूक होईल त्या दिवसापासून त्या पदाला मान्य दिली जावी अशी मूलभूत सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते आणि सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नैसर्गिक वाढीमुळे निर्माण होणा-या शिक्षकांच्या पदासंबंधी आणि त्यांना द्यावयाच्या वेतनासंबधी शासनाला काही सूचना केलेल्या आहेत. नैसर्गिक वाढीमुळे पदांची वाढ होतच जाणार आहे. कारण विद्यार्थ्यांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे तुकड्या वाढतात आणि त्यामुळे शिक्षकांची पदेही वाढतात. या पदांना मान्यता देण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाकडे उशिरा प्रस्ताव आला आणि त्यामुळे उशिरा मान्यता मिळाली या बाबीं विचारात घेतल्या तरी यामध्ये प्रामुख्याने शासनाकडूनच दिरंगाई झालेली आहे. ज्या शिक्षकांनी काम केलेले आहे त्याचा पगार त्यांना मिळाला पाहिजे. काही पदांना आता जरी प्रशासकीय मान्यता दिली असली तरी काही शिक्षकांना 26 महिन्यांचा तर काही शिक्षकांना 38 महिन्यांचा पगार दिलेला नाही. प्रशासकीय दिरंगाईमुळे या शिक्षकांवर अन्याय झालेला आहे. म्हणून ज्या तारखेपासून या शिक्षकांची नेमणूक झाली त्या तारखेपासून त्यांना वेतन मिळाले पाहिजे. दुसरे असे की, 58 पदे वगळण्याचे कारण काय आहे ? याबाबतीत कागदपत्रांची पूर्तता करुन घ्यायची राहिली असेल तर ती पूर्तता करुन घेऊन या 58 पदांनासुध्दा मान्यता देऊन त्या शिक्षकांनाही पगार द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी खाजगी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनाच्या संदर्भात या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यावर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, सन्माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड आणि सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. विद्यार्थ्यांची संख्या वाढ, शिक्षकांवर पडणारा अतिरिक्त कार्यभार या गोष्टी विचारात घेऊन अतिरिक्त पदांना मंजुरी देण्याची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांच्या संख्यावाढीमुळे ही पदे निर्माण होतात. तसेच शाळेतील शिक्षकांचा कार्यभार बदल्यामुळे, दोन स्वतंत्र अर्धवेळ पदे एकत्रित केल्यामुळे, अर्धवेळ पदांचे रुपांतर पूर्णवेळ पदांमध्ये केल्यामुळे अशी पदे निर्माण् होतात. अशा पदांच्या बाबतीत 30 सप्टेंबरला पट पडताळणी होते आणि 31 ऑक्टोबर पर्यन्त उप संचालकाकडून संचालकांकडे प्रस्ताव पाठवावा लागतो आणि संचालकांनी त्या प्रस्तावाची छाननी करुन तो मंत्रालय स्तरावर पाठवावा लागतो. मंत्रालयस्तरावरील वित्त व नियोजन विभागाकडून सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळत असते. सन 2003-04 आणि 2004-05साठी 569 पदांचा प्रस्ताव होता.

...नंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ........

परंतु त्यापैकी 30 पदे नवीन विषय सुरु केल्यानंतर कायम विनाअनुदान तत्वावर आहेत. 2001 साली शासन निर्णय झाला आहे की, नवीन विषयामुळे पदे निर्माण होतात ती कायम विनाअनुदान तत्वावर दिली जातात. त्यामुळे ती छाननी केल्यानंतर ती पदे वगळली आहेत. 569 पदांना मान्यता देण्याचा प्रश्न आहे. 2003-04 मध्ये उच्च माध्यमिक शाळातील 193 वाढीव शिक्षकांच्या पदांना मान्यता दिली व 28 पदे प्रलंबित राहिली. 2004-05 मध्ये 318 पदे मान्य झाली. त्याकरीता सप्टेंबर ते नोव्हेंबर महिन्याकरीता रु.25.86 लाख आकस्मिकता निधीतून दिले आहेत. त्याकरीता पुरवणी मागणी सादर झाली आहे. रु.79.36 लाख 2004-05 करीता पुरवणी मागणी आली आहे. शासन निर्णय असा आहे की, जोपर्यंत निधी उपलब्ध होत नाही तोपर्यंत खाजगी शाळातील शिक्षकांचे वेतन देण्याची जबाबदारी संबंधित शैक्षणिक संस्थांची आहे. शासनाची जबाबदारी नाही. त्यामुळे मागील फरकाच्या मागणीसाठी सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या, 39 महिने आणि 28 महिन्याचे वेतन मिळाले नाही, त्याबाबत दिरंगाई झाली हे खरे आहे. ती दिरंगाई टाळण्यासाठी शासन निर्णय घेत आहे. 30 सप्टेंबरच्या पटसंख्येबाबत 31 ऑक्टोबरपर्यंत उपसंचालकांनी संचालकांकडे प्रस्ताव पाठविला आणि संचालकांनी त्याच वर्षात शासनाकडे सादर केला तर त्यांचे वेतन वेळेवर कसे मिळेल यादृष्टीने प्रयत्न केला जाईल. काम केलेल्या शिक्षकांना वेतन हे मिळालेच पाहिजे याच्याशी मी सहमत आहे. प्रशासकीय दिरंगाई झाली आहे, ती निश्चितपणे टाळली जाईल आणि यापुढील काळात वेळेवर वेतन मिळेल याची शासन खबरदारी घेईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न सुटलेला नाही. 5.40 लाख रुपयांची तरतूद केली आहे किंवा मान्य केली होती. 2003-04 च्या पदांसाठी रु.1 कोटी रुपयांची तरतूद होती व 2004-05 च्या पदांसाठी रु.1 कोटी, 85 लाख, 30 हजार इतकी तरतूद आता केली. 1.23 कोटी ऐवजी 25 लाख व 1.65 कोटी ऐवजी 29 लाख एवढी तरतूद शिक्षकांच्या सहा महिन्याच्या वेतनासाठी आहे. 38 महिन्यांचे वेतन कसे मिळणार? शासनाचे म्हणणे आहे की, संस्थांनीच वेतन द्यावी. परंतु असा नियम नाही. अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचे वेतन देण्याची जबाबदारी शासनाची आहे, संस्थांची नाही. त्यामुळे त्यांना कोणत्याही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..........

परिस्थितीत वेतन मिळेल आणि उर्वरित 58 पदांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी मंत्रीमहोदयांनी वेळ द्यावा. दुसरा विषय आहे तो म्हणजे तातडीने शिक्षकांना वेतन मिळाले पाहिजे. ती जबाबदारी शासनाला टाळून चालणार नाही. प्रत्येक गोष्टीसाठी न्यायालयात जाण्याची वेळ आणू नये.

श्री.हसन मुश्रीफ : उर्वरित शिक्षक राहिले आहेत त्यांच्या वेतनाबाबत बैठक घेऊन निश्चितपणे त्यांचा प्रश्न सोडवू. शिक्षकांना नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा सातत्य देण्यात आले आहे त्यांना निवृत्तीपश्चात फायदे दिले जातात. वेतन थकबाकीबाबत शासनाचा निर्णय आहे. त्यामुळे त्यांना आपण वेतन फरक देऊ शकत नाही. 58 पदे आहेत त्याबाबत निश्चितपणे चर्चा केली जाईल. पुरवणी मागणीद्वारे जी तरतूद केली आहे त्यानुसार वेतन दिले जाईल.

श्री.कपिल पाटील : मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये मान्य केले की, दिरंगाई झाली आहे व तरतूद देखील उपलब्ध आहे. दिरंगाई झाली ही शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे त्यापासून पळ काढता येणार नाही.

**उपसभापती** : पुरवणी मागणीमध्ये या बाबीचा समावेश केलेला आहे असे सांगितले आहे. माझी अशी विनंती आहे की, हा विषय सोडविण्याच्या दृष्टीने मंत्रीमहोदयांनी बैठक घेण्याचे मान्य केले आहे. त्या बैठकीमध्ये या गोष्टीचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी करावा व मंत्रीमहोदयांनी त्याचवेळी निवाडा द्यावा.

श्री.हसन मुश्रीफ : होय. बैठक घेऊ.

**उपसभापती** : जे प्रश्न प्रलंबित राहिले आहेत त्याबाबत बैठक पुढील दोन दिवसात घेतली जाईल का?

श्री.हसन मुश्रीफ : होय.

श्री.धोंडीराम राठोड : शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून वेतन मिळाले पाहिजे. मंत्रीमहोदयांनी नकार दिला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अस्पष्टरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडिराम राठोड .....

सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांना शिक्षकांच्या पगाराच्या संदर्भात जबाबदारी झटकता येणार नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे. शासनाचा निर्णय ज्या तारखेपासून झालेला आहे त्या तारखेपूर्वीचा पगार दिला जात नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शिक्षकांनी जे काम केलेले आहे त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळाला पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या शिक्षकांना कामाचा मोबदला देण्याची जबाबदारी ही त्या त्या संस्थेची आहे. शासनाने या शिक्षकांना ज्या दिवसापासून मान्य केलेले आहे त्या दिवसापासून त्यांना पगार देण्याची शासनाची जबाबदारी आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, हा पगार देण्याची जबाबदारी त्या त्या संस्थेची आहे. या शिक्षकांना शासनानेच पगार दिला पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भात मी अगोदरच सांगितले आहे की, यामध्ये 39 महिन्यांची दिरंगाई झालेली आहे. यामध्ये डेप्युटी डायरेक्टर, डायरेक्टर आणि शासन मिळून टाईम बाऊंड प्रोग्राम करण्यात येईल. यापुढे पगार मिळण्यामध्ये विलंब होणार नाही एवढे मी सांगू इच्छितो. शासनाने ज्या तारखेपासून मान्य केले आहे त्या तारखेपासून पगार मिळेल.

**उपसभापती** : अर्धातास चर्चा संपलेली आहे.

-------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अंध, अपंगाच्या विशेष अनुशेष भरतीमध्ये पूर्ण अंध व्यक्तींना पदांपासून वंचित ठेवणे.

**मु. शी.** : अंध, अपंगाच्या विशेष अनुशेष भरतीमध्ये पूर्ण अंध व्यक्तींना पदांपासून वंचित ठेवणे या विषयावर स-मा-ा-नीय सदस्य श्री.संजय केळकर वि.प.स.यां-ी उपस्थित ज़ेलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदविधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 92 अ-वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित ज़रीत आहे.

"मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 7 सप्टेंबर, 2006 रोजीच्या आदेशानुसार अंध, अपंगांची विशेष अनुशेष भरती शारसनाने सुरु करणे, मात्र सदर भरती प्रक्रियेत पूर्णत: अंध आणि अल्पदृष्टी, अंध असा भेदभाव करत पूर्ण अंध व्यक्तींना बहुतेक पदांपासून वंचित ठेवणे, मा. उच्च न्यायालयाने आपल्या आदेशा असा कोणताच भेदभाव करणारा आदेश दिलेला नसणे, शासनाच्या विविध विभागामार्फत जाहीर केलेल्या बहुतेक जाहिरातींमध्ये अंधाऐवजी अल्पदृष्टी अंधानाच संधी देणे , त्यामुळे पूर्ण अंध असणा-या व्यक्ती सदर भरतीपासून वंचित राहणे सदर भरती प्रक्रिया रद्द करुन सर्व अंधाना समान न्याय देणारी न्वयाने भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, नियम 92 अन्वये चर्चा करण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपला कृतज्ञ आहे. अंध, अपंगांच्या विशेष अनुशेषाच्या भरतीसंदर्भात या ठिकाणी मी माझे विचार मांडणार आहे. सन 1995-96 च्या अंध, अपंगांच्या कायद्याला धरुन "अंधअपंगांची नोक-यामध्ये भरती व्हावी, अनुशेष भरला जावा" याबाबत एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. यांसदर्भात 7 सप्टेंबर, 2006 रोजी उच्च न्यायालयाने आदेश दिला व त्यानुसार अनुशेष भरती सुरु झाली. शासनाच्या विविध खात्यामार्फत जाहिराती देऊन भरती सुरु झाली. दिनांक 2 मे 1998 व 10 ऑगस्ट, 2005 च्या शासन निर्णयात प्रवर्ग विशद करतांना अंध किंवा अल्पदृष्टी असे म्हटले आहे. त्यातील "किंवा" काढून टाकण्यात यावा. ही भरती करतांना जाहिरात देऊन अंध किंवा अल्प दृष्टीच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीमुळे या भरतीमध्ये पूर्ण अंध, पूर्ण मुका,

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

बहिरा, पूर्णपणे एक हातपाय नसणे यांना सरळसरळ नाकारले जात असल्याचे दिसून आले आहे. आज संपूर्ण राज्यात 3 ते 4 लक्ष अंध व्यक्ती आहेत. अंध किंवा अपंग व्यक्ती धडधाकट माणसापेक्षा चांगल्या प्रकारे काम करु शकतात हे सर्वांना माहिती आहे. असे असतांनाही ही जाहिरात अंध किंवा अल्पदृष्टी असलेल्यांसाठी असल्यामुळे पूर्ण अंधाना डावलण्यात आलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझ ी मागणी आहे की, ही भरती मोहिम पूर्ण अंधांवर अन्याय करणारी असल्यामुळे या भरतीला स्थगिती देऊन पूर्ण अंध व अपंगाना सुयोग्य प्रमाणात संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. रोजगार संशोधन समिती पुनर्गठीत करुन पूर्ण अंध, अपंगांच्या रोजगार संशोधन संधीची समीक्षा व्हावी. तसेच टंकलेखन, लघुटंकलेखन, दुरध्वनीचालक, संगणकचालक , डाटाऐंट्री ऑपरेटर, लिपीक , फिजीओथेरपी, हस्तकला संगीत, भाषा शिक्षक, प्राध्यापक, व्याख्याता, अधिव्याख्याता, अनुवाद, स्वयंपाकी, शिपाई इ.पदांच्या बाबतीत अंधांना प्राध्यान्याने नोकरीत घेऊन न्याय मिळवून द्यावा. अल्पदृष्टीच्या व्याख्येची समीक्षा केली जावी. अपंगत्वाच्या दाखल्याची पडताळणी केंद्रीय मंडळ नेमून केली जावी. खोटया व बोगस प्रमाणपत्रधारकांवर व प्रमाणित करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी. अंपग आर्थिक विकास महामंडळाच्या प्रत्येक प्रवर्गाचे विभाग करुन कर्ज वाटप केले जावे. अशा प्रकारे कर्जवाटप केले तर सर्वांना समान न्याय मिळू शकेल.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...........

माझी शेवटची मागणी आहे की, ज्या दृष्टीहीन व्यक्ती आहेत त्यांच्यासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयामध्ये जागा उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन त्यांचा रोजगाराचा प्रश्न मिटू शकेल. शासनाने आता काढलेली भरती मोहीम ही अंध व्यक्तींवर अन्याय करणारी असून त्या भरतीस शासनाने स्थगिती द्यावी. तसेच मी काही सूचना केलेल्या आहेत त्याचा शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी अंध अपंगांच्या विशेष भरतीच्या अनुषंगाने आपले विचार मांडले आणि शासनाला काही सूचना केल्या आहेत. राज्य शासनाने अपंगांना नोकरीमध्ये तीन टक्के आरक्षण दिलेले आहे. या संदर्भात केंद्र सरकारचा कायदा आहे. या कायद्यात असे म्हटलेले आहे की, " Total absence of sight or visual acuity not exceeding 6/60 or 20/200 in the better eye limitation of the field of vision". त्यामुळे या कायद्याच्या बाहेर आपल्याला जाता येणार नाही. तरी सुध्दा शासनाने निर्णय घेऊन दिनांक 3 नोव्हेंबर रोजी एक जी.आर. काढून सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत की, भरती करताना पूर्ण अंधांचा देखील विचार करण्यात यावा. आपण तीन टक्क्यापैकी एक टक्का आरक्षण हे पूर्ण अंध व्यक्तींसाठी ठेवलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अपंगांचे जे महामंडळ आहे त्यांना मदत दिली पाहिजे. त्याबाबत राज्य शासन जरुर विचार करेल. मी पुन्हा एकदा नमूद करु इच्छितो की, पूर्ण अंध व्यक्तींचा नोकरीमध्ये प्राधान्याने विचार करावा अशाप्रकारचा शासनाने जी.आर.काढलेला आहे. अंध अपंगांच्या होणाऱ्या भरतीमध्ये गैरव्यवहार होत असल्याबाबतच्या तक्रारी वेगवेगळ्या संघटनांकडून आमच्याकडे आलेल्या आहेत. तसेच त्यांनी काही चांगल्या सूचना देखील केलेल्या आहेत. डॉक्टरांकडून अंध व्यक्तींची व्यवस्थित टेस्ट केली जात नाही आणि त्या उमेदवारांना अंध-अपंग म्हणून नोकरीमध्ये सामावून घेतले जाते, अशाप्रकरची निवेदने आमच्याकडे काही संघटनांनी दिलेली आहेत. अशाप्रकारचा गैरव्यवहार झ ाालेला आहे किंवा कसा याचा आम्ही शोध घेत आहोत. जर असा गैरव्यवहार झाला असेल तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल अशी भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, राज्य सरकारने अंध-अपंगांच्या भरतीसंबंधी जी जाहिरात दिलेली आहे त्यामध्ये अंध किंवा अल्प दृष्टी असे म्हटलेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, "किंवा" हा शब्द वगळण्यात यावा. कारण "किंवा" या शब्दामुळे अंध व्यक्ती सोडून अल्पदृष्टी असलेल्यांचा प्राधान्याने विचार केला जातो.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य जे सांगत आहे त्याप्रमाणे आपल्याला जाहिरातीमध्ये बदल करता येणार नाही. कारण हा केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे आपल्याला त्यामध्ये बदल करता येणार नाही.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी अगदी अचूक प्रश्न विचारलेला आहे. अंध किंवा अल्पदृष्टी असलेल्या व्यक्तींमध्ये अल्पदृष्टी व्यक्तींचा नोकरीमध्ये प्राधान्याने विचार होऊ शकतो. त्यामळे पूर्ण अंध असलेल्या व्यक्तीवर अन्याय होण्याचा संभव आहे. कोणताही कायदा करावयाचा झाला तर त्या कायद्याचा सर्वांना समान न्याय मिळाला पाहिजे. केंद्र सरकारचा कायदा असला तरी आपण येथे कशासाठी बसलो आहोत ? सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न अगदी बरोबर आहे. त्यादृष्टीने राज्य सरकार कोणती कार्यवाही करणार आहे हे त्यांनी सांगावे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने जो आदेश दिला त्यामध्ये अंध, अल्पदृष्टी असे कुठेही म्हटलेले नाही. शासनाने सर्वांना समान न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सर्वांना समान न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने जी.आर.काढलेला आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आपण उत्तरामध्ये म्हटले की, असे आम्हाला करता येणार नाही, कारण केंद्र सरकारने हा नियम केलेला आहे. शेवटी, या विधीमंडळात किंवा संसदेमध्ये जे नियम आणि कायदे केले जातात ते सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठीच केले जातात. त्यामुळे कुठेतरी झुकते माप द्यावयाचे आणि नियम बनवायचे व ते आपण ॲक्सेप्ट करावयाचे, हे बरोबर वाटत नाही. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी बाजू मांडली ती बरोबर आहे. त्यांची सूचना स्वीकारण्याची आपण मानसिकता ठेवावी.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. याबाबतीत आपण केंद्र सरकारकडे विनंती करु व त्यांच्याकडे हे पाठवू. याबाबतीत न्याय देण्याचीच भूमिका आम्ही घेतलेली आहे. यासंदर्भातील जी.आर.ची प्रत मी आपल्याकडे पाठवतो.

श्री सय्यद कमरुझ जामा :सभापति महोदय, ब्लाइंड व्यक्तियों के बारे में जो जी. आर. जारी किया गया है, उसके बारे में अपंग व्यक्तियों में अशांति फैली हुई है और वे दुखी है. अभी माननीय मंत्री जी ने कहा कि यह केन्द्रीय सरकार का कानून है, राज्य सरकार इसमें संशोधन नहीं कर सकती है. मैं माननीय मंत्री जी से अनुरोध करुंगा कि अपंगों के लिए जो भरती प्रक्रिया शुरु की गई है, उसके अन्तर्गत जो व्यक्ती पूरी तरह नेत्रहीन है, उस को नौकरी नहीं दी जा रही है, जो पार्टली नेत्रहीन है, उनको नौकरी दी जा रही है. इस के विरोध में ब्लाइंड व्यक्तियों ने मोर्चा निकाला था और मांग की थी कि उनको भी नौकरी दी जाए. मेरा सरकार से अनुरोध है कि यह समाज का कमजोर वर्ग है इसलिए भरती की प्रोसेस थोड़े दिन रोक कर इस कानून में संशोधन करने के लिए केन्द्रीय सरकार से कहा जाए. साथ साथ मेरी इस सरकार से यह विनती है कि इस संबंध में शासन स्तर पर पुनर्विचार करके योग्य निर्णय लिया जाए और जो व्यक्ति 40 प्रतिशत, 30 प्रतिशत ब्लाइंड है, उनको भी नौकरी देने के बारे में विचार किया जाए.

श्री.धर्मरावबाबा अत्राम : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाने राज्यातील काही भागांत एसईझेड राबविण्याचा घेतलेला निर्णय.

**मु. शी.** : शासनाने राज्यातील काही भागांत एसईझेड राबविण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी स-मा-ा-ीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यां-ी उपस्थित जेलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडून दिलेले) : अध्यज महाराज, मी आपल्या अ-ुमती-े -ियम 92 अ-वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित जरतो :-

"शासनाने राज्यातील काही भागात व विशेषत: नवी मुंबई, पनवेल आदि भागातील विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) राबविण्याचा घेतलेला निर्णय, विशेष आर्थिक क्षेत्रासाठी सुमारे 40 हजार हेक्टर जमिनीची आवश्यकता असून नवी मुंबईला विशेष आर्थिक क्षेत्रात रिलायन्स उद्योग समुहासाठी सुमारे 2200 हेक्टर जमीन लागणार असून नवी मुंबई, पनवेल आदि भागातील शेतकऱ्यांच्या सुपिक जमिनी अत्यल्पदराने संपादन करण्याबाबत शासनाने सुरु केलेली कारवाई, रिलायन्सच्या व इतर उद्योगांसाठी लागणाऱ्या जमिनीपेक्षा कितीतरी अधिक जमीन संपादित करण्यात येऊन ती अतिरिक्त जमीन रिलायन्स आदि कंपन्यांना विकण्याची शासनाने दिलेली मुभा, नवी मुंबई येथील सध्या सिडको व रिलायन्सच्या मालकीच्या जमिनीचा भाव प्रति हेक्टरी एक कोटी रुपये असणे, परंतु तेथील स्थानिक शेतकऱ्यांची जमीन फक्त हेक्टरी अडीच लाख रुपये या दराने घेण्यात येणे, अशा प्रकारे शेतकऱ्यांची शासनाच्या मध्यस्थीने करण्यात येणारी लूट व याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही "

सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये अनेक ज्वलंत विषयांवर चर्चा होणे अपेक्षित होते. अधिवेशन काळात ठिकठिकाणी होत असलेल्या हिंसाचारामुळे या महत्वाच्या प्रश्नास जागा मिळेल की नाही याची मला चिंता वाटत होती. म्हणून तातडीने मी या विषयावर अर्धातासाची चर्चा उपस्थित केली. यावर अजूनही तपशीलवारपणाने चर्चा होऊ शकते. या महत्वाच्या प्रश्नासंबंधी सरकारकडून समाधानकारक उत्तर येण्याच्या दृष्टीने आपण नेहमीप्रमाणे आम्हाला चांगले संरक्षण द्याल, असा माझा विश्वास आहे.

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) या विषयाबाबत महाराष्ट्रामध्येच नव्हेतर संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांच्या मनामध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झालेली आहे. प्रत्यक्षात याबद्दलचे आंदोलन आणि नवी मुंबईजवळ रिलायन्स उद्योग समुहाने उद्योग उभारण्याच्या दृष्टीने हजारो एकरांची शेतजमीन घेण्याच्या विरोधामध्ये फारमोठे आंदोलन तेथील स्थानिक लोकांनी आणि शेतकऱ्यांनी उभारले. त्याचबरोबर पुण्यातील खेड तालुक्यात आणि महाराष्ट्रामध्ये विविध ठिकाणी 28 प्रकल्प उभे राहणार आहेत. आपल्या सगळयांना कल्पना आहे की, गेल्या काही वर्षामध्ये खाजगीकरण आणि खासकरुन विकास करण्याच्या दृष्टीने उदारीकरणाची भूमिका सरकारने स्वीकारली आहे. उद्योगांना वाव मिळण्याच्या दृष्टीने असे मॉडेल्स स्वीकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. असे करत असताना अनेक राजकीय पक्षांनी वेगवेगळी भूमिका स्वीकारलेली आहे. काहींनी यास समर्थनही दिले आहे. डाव्या पक्षांनीही त्यांची भूमिका मांडलेली असून संपूर्ण एसईझेड प्रकल्पच रद्द करावा अशी त्या पक्षाने मागणी केलेली आहे. मी ज्या पक्षाचे प्रतिनिधीत्व करते, त्यामध्ये हे संपूर्ण रद्द करावे असे म्हणण्यापेक्षा एसईझेडमधून सर्वसामान्यांच्या हिताला आणि शेतकऱ्यांच्या हिताला तिलांजली न देता नॉर्म्स् स्टॅण्डर्डप्रमाणे किमान हित लक्षात ठेवून चांगल्या प्रकारची कार्यपध्दतीची सुधारणा होणे आवश्यक आहे. परंतु आता नवी मुंबईच्या सगळया चित्रावरुन दिसते की, ज्या जमिनीला कोटयावधी रुपयांचा भाव मिळू शकतो त्या जमिनी अतिशय कमी दराने लोकांच्या विकत घेतल्या जात आहेत. प्रत्येक ठिकाणच्या जमिनीची कनेक्टीव्हीटी आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. डाव्या पक्षांचा एस.ई.झेड.ला विरोध नाही तर जे नॉर्म्स ठरवून देण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे अंमलबजावणी झाली पाहिजे, असा आग्रह आहे. सन्माननीय नेते, श्री.सिताराम येचुरी यांचे असे म्हणणे आहे की, ज्या वरकस, सरकारी, पडिक जमिनी आहेत त्या जमिनींवर अग्रहक्काने एस.ई.झेड उभारावेत. ज्या सुपिक जमिनी आहेत त्यांचा विचार करण्यात येऊ नये. म्हणून मला या ठिकाणी असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, डाव्या पक्षांचा एस.ई.झेड.ला विरोध नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्या, डॉ.नीलम गो-हे यांचे मी अभिनंदन करतो की, त्यांनी हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला. राज्याच्या आर्थिक जडणघडणीमध्ये बदल करणारा हा विषय आहे. हा अर्ध्या तासाच्या चर्चेचा खरं तर विषय नाही, यासाठी कमीतकमी अडीच तासाची चर्चा होणे आवश्यक होते. त्यामुळे आपल्या विशेषाधिकारात या चर्चेला आपण थोडा अधिक वेळ द्यावा, अशी माझी विनंती आहे. शेतक-यांवर, उद्योगांवर आणि एकूणच जनमानसावर परिणाम करणारा हा विषय आहे. अर्ध्या तासाच्या चर्चेत या विषयाला वाटाण्याच्या अक्षता लागता कामा नयेत, अशी आमची अपेक्षा आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, अनेक विषय शेवटच्या क्षणी सभागृहात चर्चेला येतात व त्याला योग्य न्याय मिळत नाही. आणि मग पुढील मार्चच्या अधिवेशनापर्यन्त उशीर झालेला असेल, असे मला स्वत:ला वाटते. त्यामुळे कुठल्याही पक्षाच्या भूमिकेमध्ये मी जाणार नाही, त्याविषयी मी बरेचसे बोलू शकेन. परंतु, एस.ई.झेड.चा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. कायद्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्था आहेत, ग्राम पंचायती, नगरपालिका, जिल्हा परिषदा यामधील लोकप्रतिधिंना एस.ई.झेड.च्या प्रक्रियेमध्ये कोणते स्थान असणार आहे ? या प्रकल्पांची आखणी होत असतांना स्थानिक स्वराज्य संस्थातील लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार यांना विश्वासात घेऊन पारदर्शकतेने माहिती देण्याची कोणतीही कार्यवाही सरकारने आतापर्यन्त केलेली नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की, जमिनी ताब्यात घेण्याची प्रक्रिया पुढे गेलेली आहे. साम, दाम, दंड, भेद निती वापरली जात आहे. परंतु, या सर्वांच्या पुनर्वसनाची शाश्वती काय

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे........

आहे ? आपण जेंव्हा असे म्हणतो की, वेगवेगळया पध्दतीने जमिनीचा मोबदला मिळणार नाही तेंव्हा नोक-यांमध्ये किंवा प्रकल्पाच्या कुठल्याही लाभामध्ये स्थानिक लोक, शेतकरी यांच्यासाठी हमी देण्याची कुठलीही तयारी नाही. डॉ.स्वामीनाथन समितीचा अहवाल आहे, जागतिक बँकेने विचारणा केली आहे. एका बाजुला सुपीक जमीन घेतली जात आहे व नापीक जमीन देखील घेतली जात आहे. सुपीक जमिनी सरळ सरळ उद्योगांच्या हातामध्ये जात आहेत. अशा पध्दतीने झाल्यानंतर कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न असो, विकासाचा निर्णय असो त्याबद्दलचा अंतिम अधिकार या कायद्यानुसार संबंधित उद्योजकांना मिळणार आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, स्थानिक लोकांपैकी काही लोकांना त्यांच्या जमिनी द्यावयाच्या नसतील परंतु त्या जर शासनाने संपादित केल्या तर त्यांना किती वेळामध्ये नुकसान भरपाई मिळणार आहे ? नापीक जमिनी न घेता सुपीक जमिनी घेतल्या तर त्यांना रोखण्याची किंवा त्यावर सरकारचे म्हणणे मांडण्याची कोणतीही यंत्रणा सध्या आस्तित्वात नाही. जमिनी ताब्यात घेतांना सरकारचे अधिकारीच उपस्थित असतात, त्यांच्यासमोर सर्व व्यवहार ठरतात. त्यावेळी शेतक-यांना असे सांगितले जाते की, जेवढे पैसे आम्ही देतो आहोत तेवढे घ्यावयाचे असतील तर घ्या नाही तर पुढील टप्प्यापर्यन्त पैसे मिळणार नाहीत. पुढचा टप्पा कधीच येणार नाही. असे जर शेतक-यांना सांगितले जात असेल तर एस.ई.झेड.मधील जो शेवटचा झेड आहे त्यानुसार शेतक-यांच्या हातामध्ये झिरो म्हणजे शुन्य येणार आहे. शेतक-यांनी हिंसक आंदोलन केल्याशिवाय, दलितांनी हिंसक आंदोलन केल्याशिवाय आपण त्यांचे काही ऐकूनच घेणार नसू तर हिंसक आंदोलन केले म्हणून त्यांना दोष देता येणार नाही.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 11:25

डॉ.नीलम गो-हे .........

मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, त्याचे पुनर्वसन कसे होणार, पुनर्वसनाची शाश्वती काय आहे याबाबतची माहिती सभागृहाला देण्यात यावी. तसेच कंपन्यांना जमिनी देतांना त्यांना भारताचे कोणतेही कायदे लागू होणार नाहीत असे होऊ नये. नाही तर तेथे प्रवेश करण्यासाठी कंपन्यांचा परवाना घ्यावा लागेल. अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाने स्वीकारलेली आहे काय ? नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांच्या सदस्यांचे व लोकप्रतिनिधींचे अस्तित्व त्या कंपन्यांमध्ये राहणार आहे की नाही ? लोकप्रतिनिधींचे अस्तित्व तेथे असावे कारण ते लोकांच्या हिताचे संरक्षण करु शकतील. ज्याप्रमाणे दमण या केंद्रशासित प्रदेशामध्ये नगरपालिका आहे. त्या नगरपालिकेचे सदस्य केंद्र सरकारशी बोलू शकतात. त्याप्रमाणे येथे सुध्दा पंचायत समित्यांचे अस्तित्व शाबूत ठेवावे. तेथील लोकांना स्वयंपूर्ण करण्याची संधी दिली नाही तर शेतकरी पुढच्या काळामध्ये वा-यावर सोडला जाईल. विशेष आर्थिक क्षेत्रसाठी वीज कोठून आणली जाणार आहे ? तसेच विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण केल्यामुळे तेथील लोकांवर अन्याय होणार नाही ना ? हे देखील पाहणे आवश्यक आहे. विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करतांना स्थानिक आमदार, लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना यांच्यासमोर विशेष आर्थिक क्षेत्रातील योजनांचे व्यवस्थित प्रेझ ेंटेशन केले पाहिजे. तसेच, महिन्या दोन महिन्यांनी आढावा घेण्याची पद्धत ठेवली जावी. खेडमध्ये विशेष आर्थिक क्षेत्रासाठी शेतक-यांच्या जमिनी संपादित करण्यासाठी नोटीसा आलेल्या आहेत. शेतक-यांनी जमिनी दिल्या नाही तर अंडरवर्ल्डच्या लोकांना आणून जमिनी ताब्यात घेतल्या जातील असे शेतक-यांना उत्तर दिले जात आहे. सत्ताधारी पक्षाच्या संबंधीत लोकप्रतिनिधींनी विशेष आर्थिक क्षेत्रासाठी शेतक-यांकडून जमिनी विकत घेण्यासाठी बैठक सुरु केलेली आहे. याबाबतीत चार बोटे उद्योजकांकडे आणि पाचवे बोट सत्ताधारी पक्षाशी संबंधीत लोकप्रतिनिधींकडे दाखविले जात आहे. त्यांच्याकडून शेतक-यांवर दबाव आणण्याचा उद्योग सुरु आहे. विशेष आर्थिक क्षेत्र महाराष्ट्रामध्ये राबवित असतांना कोणती कार्यपद्धती हाताळली जाणार आहे, लोकप्रतिनिधींना कसे विश्वासात घेतले जाणार आहे, शासन पुनर्वसनाची कोणती हमी देणार आहे याचा कालबद्ध कार्यक्रम या अधिवेशनामध्ये मांडला पाहिजे. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण त्या परिसरातून निवडून आलेला आहात. आपली सकारात्मक

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .........

भूमिका असली तरी शेतक-यांचे हित समोर ठेवून शेतक-यांना कागदोपत्री संरक्षण देऊ असे सांगणे आणि प्रत्यक्ष संरक्षण मिळणे यामध्ये फरक आहे. म्हणून शेतक-यांना खरोखरच संरक्षण मिळाले पाहिजे याची काळजी घेणे आवश्यक आहे. विशेष आर्थिक क्षेत्रच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये हिंसाचार होऊ नये म्हणून या प्रकल्पाचे धोरण कसे असणार आहे, याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाला द्यावी.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर इतर सन्माननीय सदस्य प्रश्न विचारु शकता, असा आपला नियम आहे. मी प्रत्येक सन्माननीय सदस्याला बोलण्याची संधी देईन. या विषयावर मी देखील 5 मिनिटे बोलणार आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी मला माझ्या जबाबदारीची जाणीव करुन दिलेली आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण आम्हाला बोलण्याची परवानगी दिली तर आम्ही बोलू.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आता ही चर्चा संपण्यासाठी 15 मिनिटे राहिलेली आहेत. या चर्चेला अडीच तासाचा वेळ द्यावा, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : आपण ही अर्धा तास चर्चा चर्चेला घेतलेली आहे. वेळ पुरला नाही तर आपल्या विनंतीचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

...3/-



GRB/ SBT/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 11:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्राचा कायदा केंद्र सरकारचा आहे. कोणत्या राज्यामध्ये किती आर्थिक क्षेत्र मंजूर करावे हा अधिकार केंद्र सरकारला आहे. विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करण्याचा हेतू असा आहे की, राज्यांमध्ये गुंतवणूक वाढावी, आपल्या देशामध्ये निर्माण होणा-या वस्तू जागतिक स्पर्धेमध्ये टिकाव्यात.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण...

प्रत्यक्षात हा जो झोन आहे तो निर्यात करण्यासाठी म्हणून आहे, त्यामध्ये उत्पादित होणाऱ्या मालाची विक्री देशांतर्गत बाजारपेठांमध्ये करता येणार नाही. त्यासाठी खास सवलती त्यांना देण्यात आलेल्या आहेत उदा. त्या झोनमध्ये उत्पादित होणाऱ्या मालावर कर नाहीत, देशातील कायदे त्यांना लागू नाहीत. हे आपण यासाठी केले आहे की, त्या ठिकाणी उत्पादित होणारा माल हा परदेशामध्ये निर्यात व्हावा, जागतिक बाजारपेठांमध्ये तो विकला जावा जेणे करून राज्यातील उलाढाल वाढली पाहिजे. त्यातून त्या त्या राज्यांमध्ये आर्थिक गुंतवणूक वाढली पाहिजे अशा प्रकारची या विशेष आर्थिक क्षेत्राची म्हणजे स्पेशल इकॉनॉमिक झोनची सर्वसाधारण कल्पना आहे. चीन हा जगामध्ये अशा प्रकारचा पहिला देश आहे की, त्याने अशा प्रकारे प्रयत्न करून त्यात यश मिळविले आहे आणि तेथे निर्माण होणार माल आज परदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात जाऊ लागला आहे. त्या पॅटर्नचा आपण विचार केला आणि त्यावर साधक बाधक विचार करून केंद्र सरकारने हा एसइझेडचा कायदा संमत केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये गेल्या दोन वर्षाचा आढावा घेतला तर केवळ एसइझ ेडमध्येच नव्हे तर एकूणच गुंतवणूक वाढावी म्हणून राज्य सरकारने खास प्रयत्न केले आहेत त्यासाठी प्रत्येक उद्योपतीशी संवाद-संपर्क साधून, प्रसंगी त्यांना आपल्याकडून जे काही सहकार्य पाहिजे ते देण्याचा प्रयत्न केला आहे. मध्यंतरी रिझर्व बँकेने जो अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यात महाराष्ट्र राज्य यामध्ये पहिला क्रमांक टिकवू शकला आहे. त्यामध्ये मेमो ऑफ अंडरस्टँडींगवर आपण सह्या केलेल्या आहेत आणि त्यातून जवळपास 33 हजार कोटीची गुंतवणूक राज्यामध्ये आलेली आहे. राज्यामध्ये गुंतवणूक चांगली व मोठ्या प्रमाणात व्हावी, त्यासाठी पोषक वातावरण या राज्यात रहावे, कोठल्याही प्रकारे रेड टेपिझम होता कामा नये, उद्योगपतींना येथे गुंतवणूक करताना कोणतीही अडचण येऊ नये, त्यांना यासाठी रेड कार्पेट ट्रिटमेंट मिळावी अशीच शासनाची भूमिका आहे. त्यासाठी या संदर्भातील कोणतेही निर्णय जलदगतीने व्हावेत आणि हे राज्य सदैव क्रमांक एक चे राज्य राहिले पाहिजे ही राज्य सरकारची भूमिका आहे. सभापती महोदय, आता या राज्यात जेथे जेथे एसइझेड होऊ घातले आहेत त्या संबंधात अनेक गोष्टींचा उहापोह येथे झाला आणि त्याबद्दल अनेकांच्या मनात विविध शंका-कुशंका असणे स्वाभाविक आहे. या संदर्भात काही ठिकाणी आंदोलने झाली, अनेकांनी या बाबतीत आपली मते प्रदर्शित केली आहेत. विविध राजकीय पक्षांनी देखील याबाबतीतील आपापल्या भूमिका मांडल्या आहेत. थोडक्यात

...... जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण ......

या एसइझेड संबंधात सर्व थरांतून संमिश्र अशा प्रतिक्रिया आलेल्या आहेत. एक तर राज्यामध्ये एसइझेड झाले पाहिजेत ही आपली भूमिका आहे आणि हे झोन होत असताना त्यातून शेतकऱ्यांवर कोठल्याही प्रकारे अन्याय होता कामा नये ही भूमिका सन्माननीय सदस्यांच्या प्रमाणेच शासनाची देखील आहे. त्यामुळे यासाठी जी जमीन संपादित करू ती पडजमीन असली पाहिजे, ज्या जमिनीमध्ये शेती होत नाही अशीच जमीन यासाठी घेतली जावी अशी शासनाची भूमिका आहे. शेतीच्या उपयोगात असलेली जमीन यासाठी घेतली जावी अशा प्रकारची भूमिका आपली कधीच नव्हती आणि नाही व यापुढेही राहणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना यामुळे कसलीही अडचण येणार नाही याची काळजी शासन घेत आहे. अर्थात कोणी आपली जमीन स्वत:हून खाजगीमध्ये विकत असेल तर त्या व्यवहारामध्ये शासन हस्तक्षेप करणार नाही. परंतु ज्या मध्ये विरोध आहे त्याबाबतीत मात्र शासन आवर्जून हस्तक्षेप करून तेथील प्रश्न सामोपचाराने सोडविण्याचाच प्रयत्न करील हे मला येथे निश्चितपणे सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रमुख प्रश्न हा महामुंबई विकास आणि विशेष आर्थिक क्षेत्र तसेच नवी मुंबईतील विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधातील आहे. महामुंबईतील आर्थिक क्षेत्र हे संपूर्णत: खाजगी क्षेत्र आहे. त्यात आपण पाहिले तर 14500 कोटी रूपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे आणि रिलायन्स कंपनीचा त्यात प्रयत्न आहे व त्यातून 9103 हेक्टर क्षेत्र संपादित करावयाचे असून त्यात उरण, पेण आणि पनवेल मधील 45 गावांचा प्रश्न आलेला आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

सभापती महोदय, याठिकाणी माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, हे शासन मागणीपेक्षा मोठया प्रमाणावर जमीन ॲक्वायर करुन त्यांना देणार आहे. माननीय सदस्यांची ही माहिती चुकीची आहे.त्यांनी 11 हजार 696 हेक्टर जमिनीची मागणी केली आहे. प्रत्यक्षात 8 हजार 257 हेक्टर आर एवढी जमीन नोटीफाय झाली आहे. जमीन संपादनाची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यामुळे कुणालाही जमिनीचा ताबा देण्यात आलेला नाही. ही कारवाई सेक्शन 6 च्या आसपास येऊन ठेपली आहे. तसेच, सेक्शन 4 अे आणि सेक्शन 5 अे ची चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाली असली तरी कुणीही जमिनीचा ताबा घेतलेला नाही. ही सर्व प्रक्रिया जमीन संपादन कायद्यांतर्गत सुरु आहे. ही कारवाई करीत असतांना ॲवॉर्ड जाहीर होण्यापूर्वी सर्वांचे म्हणणे विचारात घेतले जाईल. आणि या प्रकरणामध्ये जर कुणी जबरदस्तीने काही गोष्टी करण्याचा प्रयत्न करीत असेलतर त्याबाबत शासन दक्षता बाळगेल आणि कोणत्याही प्रकारे शेतकऱ्यांवर होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने पुनर्वसनासंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आला. मदत कार्य व पुनर्वसन हा विभाग माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे असल्यामुळे तेथील लोकांच्या पुनर्वसनासंबंधी करावयाची कार्यवाही त्यांच्या स्तरावर सुरु आहे. माझ्या विभागामार्फत जमीन संपादन कायद्यातील तरतुदीनुसार पुरेपूर काळजी घेण्यात आली आहे. या कायद्यांतर्गत जमीन संपादित करीत असतांना त्या लोकांचे पुनर्वसन झाले पाहिजे अशाप्रकारची तरतूद कायद्यामध्ये आहे. त्याचप्रमाणे त्या लोकांना साडे बारा टक्के जमीन द्यावी लागत आहे. त्याचबरोबर स्थानिक लोकांना रोजगार मिळवून देता आला पाहिजे यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जातील. विशेषत: नवी मुंबई येथे 1972 साली सिडकोने जमीन संपादित केली आहे, त्या जमिनीचा या प्रकरणाशी संबंध नाही, ती सर्व जमीन शासनाच्या ताब्यात आहे. परंतु हा महामुंबईचा विषय असून तेथील संपूर्ण खाजगी भू संपादनाची कारवाई करावयाची आहे. त्याबद्दल त्यांना विशेष पॅकेज देऊ केले आहे. त्याबाबतचा निर्णय माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या स्तरावर व्हावयाचा आहे. त्यासंबंधी निर्णय करीत असतांना व तेथील लोकांची जमीन संपादीत करीत असतांना त्यांची पूर्णपणे काळजी घेतली जाईल. त्यांचा विरोध राहणार नाही याकरीता त्यांना विशेष पॅकेज देऊन त्यांना मदत करण्याची शासनाची भूमिका राहणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण मला दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी...

**उपसभापती** : हा अत्यंत महत्वाचा विषय आहे, या बाबतच्या सर्व माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. राज्यातील जनतेच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्यामुळे या विषयावरील चर्चा अधिक व्यापक होण्याकरीता पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. त्यामुळे बैठक स्थगित होण्यासाठी 7 मिनिटे शिल्लक असली तरी मी या चर्चेकरीता 10 मिनिटांची वेळ वाढवितो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 10मिनिटांऐवजी आपण 15 मिनिटांची वेळ वाढवावी. कारण 45 गावातील शेतकऱ्यांच्यावतीने मी आंदोलन करीत आहे. तेथील सर्व प्रश्नांची मला माहिती आहे. माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना देखील माहिती आहे. सिडकोने 1972 साली जमीन संपादित केली त्यावेळचे प्रश्न आज सुध्दा शासन स्तरावर सुटलेले नाहीत. सभापती महोदय, आपण सुध्दा त्या भागातील आहात...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या जनजीवनावर परिणाम करणारा हा प्रश्न आहे...

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, आपण वाढविलेल्या वेळेमध्ये जेवढी शक्य होईल तेवढी चर्चा करावी. आणि गरज वाटली तर आपणास ही चर्चा पुन्हा घेता येईल. शासनाची त्या चर्चेला तयारी आहे.

**उपसभापती** : आता ही चर्चा खंडीत ठेवून माननीय सभापतींच्या संमतीने अडीच तासाची चर्चा घेऊ.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय,आपण अतिशय चांगला निर्णय घेतला त्याबद्दल धन्यवाद.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : खरे तर या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, अडीच तासाची चर्चा होणे आवश्यक आहे. मी सभागृहाच्या भावना माननीय सभापती महोदयांच्या निदर्शनास आणून देईन.

डॉ. नीलम गोऱ्हे : या आठवड्यात ही चर्चा ठेवावी.

**उपसभापती** : या आठवडयातील दोनच दिवस राहिलेले आहेत. याबाबत मी सन्माननीय सभापती महोदयांबरोबर चर्चा करतो आणि ही चर्चा केव्हा घ्यायची ते आजच आपल्याला सांगतो.

श्री.मधुकर चव्हाण : उद्या सकाळी 10-00 वाजता चर्चा घेतली तर आमची तयारी आहे.

**उपसभापती** : मंत्री महोदय या चर्चेसाठी आपली संमती आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : या विषयावरील अडीच तासाच्या चर्चेला माझी तयारी आहे. आपण आता वेळ जर वाढविला तर आतासुध्दा चर्चा करण्यास तयार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : या विषयावर अडीच तासाची चर्चा घ्यावी.

**उपसभापती** : विशेष बैठकीचा जो वेळ शिल्लक आहे, तोपर्यन्त ही अर्धातास चर्चा चालू ठेवू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नवी मुंबई, पनवेल भागामध्ये विशेष आर्थिक क्षेत्र राबविण्याचा सरकारने निर्णय घेतलेला आहे. नामवंत तज्ज्ञ श्री एस.एम.स्वामिनाथन यांनी सुपीक जमिनीचा वापर विशेष आर्थिक क्षेत्रासाठी घेण्यास विरोध केलेला आहे. विशेष आर्थिक क्षेत्रासाठी कोणत्या जमिनी घ्यायच्या, यासाठी एक तज्ज्ञ गटाची नियुक्ती करण्यात यावी. जमिनीचे भाव वाढलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठीचे गणित नव्याने होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी अर्धातासाच्या निमित्ताने नवी मुंबई आणि पनवेल विभागातील प्रश्न उपस्थित केला, त्याबद्दल त्यांचे मी हार्दीक स्वागत करते. नवी मुंबईतील शेतकऱ्यांच्या जमिनी सिडकोने घेऊन 30-35 वर्षे होऊन सुध्दा तेथील 30 ते 35 हजार शेतकऱ्यांचे पुनर्वसन झालेले नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात तेथील लोकांच्या पुनर्वसनाचा विचार करुनच जमिनी ताब्यात घेण्यात येतील. आजही सिडकोने जमिनी संपादन केल्यानंतर त्या ठिकाणी ज्या शेतकऱ्यांनी गरजेपोटी बांधलेली घरे आहेत ती घरे देखील रेग्युलराईज केलेली नाहीत. शेतकऱ्यांवर केलेला अन्याय आणि संपादित केलेल्या जमिनी याचा खोलात जाऊन आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. प्रकल्पग्रस्तांच्या घेतलेल्या जमिनीवर सिडकोने कॉंक्रीटच्या इमारती उभ्या केलेल्या आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा देखील मोठ्याप्रमाणात प्रश्न निर्माण झालेला आहे. आपण रिलायन्स उद्योगासाठी आणि इतर उद्योगासाठी एकत्रित जमीन संपादित केल्या जात आहेत. यापासून सरकारला नेमका काय फायदा होणार आहे? हेही सांगितले पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, शासनाने जमीन संपादित करावी आणि या उद्योजकांना ती भाडे तत्वावर उपलब्ध करुन द्यावी. यामुळे शासनाला देखील याचा जास्तीत जास्त फायदा होईल. सभापती महोदय, कंपन्यांना भाड्याने जागा देण्यासाठी शासनाने जाहिरात काढणे आवश्यक आहे. आज ज्या संपादित केलेल्या जमिनी आहेत, त्या धनदांडग्यांनी घेतलेल्या आहेत. त्या जमिनीची मूळ किंमत एकरी दीड ते दोन लाख या दराने शेतक-यांना दिलेली आहे त्यावर सिडकोने जवळजवळ कोट्यावधी रुपयाच्या भावाने त्या विकल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. उद्या सर्वसामान्य शेतकरी वैफल्यग्रस्त होऊन देशोधडीला लागू नयेत, असे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. दुसरी गोष्ट अशी की, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे असतील, किंवा तेथील लोकप्रतिनिधी असतील त्यांना विश्वासात घ्यायला पाहिजे. संपादित केलेल्या जमिनीचा जो काही व्यवहार होणार आहे. चर्चा होणार आहेत, त्या संपूर्ण चर्चेची माहिती सभागृहासमोर आली पाहिजे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याबाबतीत आज आश्वासन मिळाले पाहिजे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, रिलायन्स कंपनीबरोबर झालेला करार मंत्रिमंडळाच्या उपसमितीसमोर आला आहे काय ? असल्यास तो करार कशा प्रकारचा आहे हे सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. सभागृहात त्यावर चर्चा होणे गरजेचे आहे. स्पेशल इकॉनॉमिक झोनबाबतचे धोरण, कंपन्यांबरोबर करीत असलेले करार सभगृहासमोर ठेवणार काय ? प्रकल्पनिहाय आराखडा आणि धोरण सभागृहासमोर सादर करणर काय ? शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. आज तेथील शेतकरी वैफल्यग्रस्त झालेले आहेत. आपण याबाबत न्याय द्यावा अशी मी अपेक्षा व्यक्त करते.

**उपसभापती** : सभागृहाच्या आजच्या विशेष बैठकीच्या कामकाजाची वेळ संपलेली आहे. दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल. सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात अडीच तासाची चर्चा मागितलेली आहे. त्याला माझी स्वत:ची मान्यता आहे. फक्त त्यासंदर्भात आपण माननीय सभापतींची परवानगी घेऊ. ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चा हवी आहे त्यांनी आता माननीय सभापतींच्या दालनामध्ये यावे. ही अर्धा-तास चर्चा संपलेली आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दु. 12.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक स.11.45 ते दु. 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**<u>महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना श्रंध्दाजली</u>**

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आज महानिर्वाण दिन आहे. लाखोंच्या संख्येने लोक आज मुंबईतील चैत्यभूमीला जाऊन त्यांना श्रध्दांजली अर्पण करीत आहेत. नागपूरमध्ये देखील विधान भवन इमारतीच्या शेजारी त्यांचा जो पुतळा आहे तेथे हजारोंच्या संख्येने लोक येऊन नतमस्तक होत आहेत. 50 वर्षापूर्वी नागपूरच्या दीक्षाभूमीवर बौध्द धर्म स्वीकारण्याचा फार मोठा कार्यक्रम झाला होता आणि त्यावेळी लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. मी या सदनाला आपल्या मार्फत विनंती करु इच्छितो की, आपण या महामानवाला सदनाच्यावतीने दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करुया.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना श्रध्दांजली अर्पण करावी अशी मी विनंती करतो.

(सन्माननीय सदस्य उभे राहातात.)

सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : प्रश्नोत्तरे.....

## नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये आपणाला नोटीस दिलेली आहे. मागील डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये राज्य सरकारने विदर्भातील शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या थांबाव्यात, त्या होऊ नयेत यासाठी 1050 कोटीचे पॅकेज जाहीर केले. परंतु हे पॅकेज जाहीर केल्यानंतर त्याची नीट अंमलबजावणी झालेली नसल्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. म्हणून जुलैमध्ये देशाचे माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांनी नागपूर आणि विदर्भाच्या भूमीला भेट देऊन शेतक-यांची विदारक स्थिती बघितली आणि त्यांनी साडेतीन हजार कोटीचे पॅकेज विदर्भासाठी जाहीर केले. 30 ऑक्टोबर पर्यन्त दोन्ही पॅकेज जाहीर होऊन देखील त्या पॅकेजची अंमलबजावणी न झाल्यामुळे विदर्भातील जवळपास 1 हजाराच्यावर शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. दर 4 तासाला एक आत्महत्या याप्रमाणे हे आत्महत्येचे सत्र वाढत चालले आहे. एकंदरीतच या राज्यातील शेतक-यांची परिस्थिती अत्यंत गंभीर झालेली आहे. माजी केन्द्रीय मंत्री श्री. मोहन धारिया यांनी या प्रश्नासंबंधी उपोषण सुरु केले होते. ते उपोषण सोडत असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना असे आश्वासन दिले होते की, 6 डिसेंबर पर्यन्त निश्चितपणे या प्रश्नाच्या बाबतीत आम्ही निर्णय घेऊ. आज 6 डिसेंबर असून या सदनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली अर्पित केलेली आहेत. आजपर्यन्त या राज्यातील शेतक-यांच्या बाबतीत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. विधानसभेच्या निवडणुकांच्या वेळी आपल्या जाहीरनाम्यामध्ये कापसाला 2700 रु. आणि धानाला 1000 रु. भाव देण्याची घोषणा केली होती. ते भाव शेतक-यांना अजून मिळालेले नाहीत.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्षनेतेच बोलण्यासाठी उठले म्हणून मी त्यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. इतरांना मी थांबविले असते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दोन्ही पॅकेज जाहीर झाल्यानंतर देखील शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत. राज्यात अतिवृष्टी झाल्यानंतर शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज देऊ अशी राज्य सरकारने घोषणा केली, आदेश काढले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

06-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) O=1

SGB/ MAP/ KGS/ 12:05

श्री.पांडुरंग फुंडकर..........

परंतु ते आदेश कोणी मानायला तयार नाही. अशा स्थितीत या राज्यातील आणि विदर्भातील शेतकरी अडचणीत आलेला आहे. म्हणून सभापती महोदय, अधिवेशन विदर्भात होत असताना रोज शेतकरी मरत आहेत, परवा खैरलांजी प्रकरणामध्ये महाराष्ट्रात तणाव निर्माण झाल्यामुळे त्या विषयावर चर्चा घडवून आणली. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, माणसे मरत आहेत अशा स्थितीत आपण कुठे गोळीबार झाला तर स्थगन प्रस्ताव मान्य करतो. परंतु जीवंत माणसे स्वत:ला जाळून घेत आहेत, विष पिऊन आत्महत्या करीत आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, सभागृहाचे आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन ज्या विदर्भामध्ये 1000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या तेथे अधिवेशन होत असताना कापूस उत्पादक आणि धान उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबले पाहिजे. शासनाने काही ठोस उपाययोजना करावी यादृष्टीने चर्चा घडवून आणण्याकरीता मी नियम289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे ती आपण मान्य करावी अशी विनंती करतो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

06-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) O=2

SGB/ MAP/ KGS/ 12:05

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंगजी फुंडकर यांनी प्रश्नोत्तराचा तास आणि इतर सर्व कामकाज बाजूला सारुन प्रथम नियम 289 अन्वये जो स्थगन प्रस्ताव दिलेला आहे तो चर्चेला घ्यावा अशा प्रकारची विनंती केलेली आहे. ती का स्वीकारावी याबद्दलचे विश्लेषणही त्यांनी केलेले आहे. ज्या विदर्भात आपण हे अधिवेशन भरवितो, त्या विदर्भातले शेतकरी मोठया प्रमाणावर आज आत्महत्या करीत आहेत. विदर्भातील जनतेला या विधीमंडळाच्या बैठकीचे जास्तीत जास्त अवलोकन करता यावे, संपूर्ण राज्यातून जे काही आपण निर्माण करतो त्याचा फायदा विदर्भातील, जो या महाराष्ट्राचा एक मोठा भाग आहे तेथील जनतेला व्हावा या उद्देशाने हे अधिवेशन याठिकाणी भरविले जाते. ज्यावेळी पक्ष सत्तेवर येतात त्यावेळी निरनिराळया प्रकारची आश्वासने देतात. कोणी म्हणतो कर्ज माफ करु, कोणी म्हणतो व्याजाची थकबाकी माफ करु. कोणी सांगतो कापसाला प्रती क्विंटल 2700 रुपये दर देऊ. एक नाही अनेक आश्वासने दिली जातात. सत्तेत आल्यानंतर सोयीनुसार सगळी आश्वासने माणसे विसरतात आणि सत्ता राबविणे हा एकमेव कार्यक्रम त्यांच्यासमोर उभा राहतो. या पार्श्वभूमीवर आज या ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत आहेत, आज माननीय मुख्यमंत्री सदनात उपस्थित आहेत. त्यांनी नुकतेच केलेले निवेदन माझ्या वाचनात आले. आता आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले असे ते म्हणाले. ही काय समाधानाची बाब आहे? आत्महत्या होतातच का? या प्रश्नाचा शोध घेऊन त्यावर इलाज करण्याची आवश्यकता आहे. प्रमाण वाढले म्हणून दु:ख आणि प्रमाण कमी झाले म्हणून समाधान हा विषय गंभीर आहे. शेवटी माणसाचे जीवन हे सर्वोच्च आहे. सर्वात मोठे स्थान माणसाला जीवंत ठेवण्यासाठीच दिले गेले पाहिजे. हे सगळे न करता शासन कुठे समाधान मानते त्यावरुन शासनाची विचार करण्याची दिशा आपल्याला कळते. म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात, आता जी सद्यस्थिती महाराष्ट्रात आहे त्यात कायदा व सुव्यवस्था आणि इतर अनेक प्रश्न आहेत. त्यासाठी सुध्दा आम्ही चर्चा घडवून आणणार आहोत. पण या प्रश्नाला प्राधान्य मिळावे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबाव्यात. फार मोठा प्रश्न प्रलंबित आहे. हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत. त्याची कारणमिमांसा करताना सुध्दा त्यावर टीकाटिप्पणी केली जाते. कोणी सांगतो त्यांना दारुचे व्यसन होते म्हणून आत्महत्या केली.........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ KGS/ प्रथम श्री. भोगले.... 12:10

श्री. मधुकर सरपोतदार....

कोणी सांगतो की, मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढले व ते फेडता आले नाही म्हणून आत्महत्या करावी लागली. शेतक-यांचा दृष्टीने हा विषय जीवनमरणाचा झालेला आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही हा स्थगन प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावार चर्चा सुरु झाल्यानंतर जे काही मुद्दे उपस्थित होतील त्यावर शासनाने आपले विचार व्यक्त करावे. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्याच्या संदर्भात शासनाने काय उपाययोजना केलेली आहे याचाही खुलासा करावा. हे अधिवेशन विदर्भामध्ये भरवले गेलेले आहे त्यामुळे या स्थगन प्रस्तावर चर्चा झाली तर त्याच्या संदर्भातील चांगला मॅसेज विदर्भातील जनतेला तसेच संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला, शेतक-यांपर्यंत जाऊ शकेल. त्यामुळे आजच्या दिवसाचे सर्व कामकाज बाजूला सारुन या स्थगन प्रस्तावर चर्चा सुरु करावी असा आमचा आग्रह आहे व त्यानुसार या स्थगन प्रस्तावावर चर्चा सुरु करावी अशी विनंती आहे. धन्यावाद.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य श्री. दीपक सावंत, यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावामध्ये त्यांनी अशी मागणी केलेली आहे की, आजच्या प्रश्नोत्तराच्या तासाचे कामकाज तहकूब करावे आणि सर्व कामकाज बाजूला ठेवून या प्रस्तावावर तातडीने चर्चा करावी. या प्रस्तावामध्ये एकूण 6 वेगवेगळे विषय दिलेले आहेत. या प्रस्तावामध्ये माननीय पंतप्रधान यांनी जाहीर केलेल्या पॅकेजची अंमलबजावणी न झाल्यामुळे झ ाालेल्या शेतक-यांच्या आत्महत्या व त्यात तिप्पटीने झालेली वाढ, शेतकरी खासगी सावकार, सोसायटया, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका यांच्या कर्जाच्या जाळयात अडकणे, शेतक-यांच्या कर्जाची वसुली 6 टक्क्यांएवेजी 11 टक्के दराने सुरु असणे, वीज भारनियमनाचे संकट गंभीर होणे, कापसाला 2700 रुपये भाव न देता हमी भावात कापूस खरेदी करणे, कर्जाचे हफ्ते कापणे इ. तसेच श्री. मोहन धारिया यांना माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्ती न होणे असे वेगवेगळे विषय या प्रस्तावामध्ये दिलेले आहेत. या बाबतीत मी एवढेच म्हणेन की, नियम 23 असे सांगतो की, ज्या ज्या वेळी असे प्रस्ताव येतात त्या प्रस्तावावर विचार करीत असतांना एखाद्या विशिष्ट बाबीवर आपण चर्चा करतो त्यावेळेला त्या बाबीसंबंधी निर्णय घेत असतो." परंतु येथे एकंदर 6 वेगवेगळे विषय आहेत.

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकरी आत्महत्या का करतात यासंदर्भातील कारणे या प्रस्तावात देण्यात आलेली आहेत. या प्रस्तावातील मुळ विषय हा शेतक-यांच्या आत्महत्या हा आहे. कालपर्यंत शेतक-यांनी आत्महत्या केलेली आहे.

**सभापती** : या प्रस्तावाच्या संदर्भात कशा पध्दतीने निर्णय घ्यावयाचा यासंदर्भात नियम 23 मध्ये माहिती विषद केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात निर्णय देत असतांना शासनाचे याबाबत काय मत आहे हे सुध्दा समजून घेणे महत्वाचे आहे.

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, आत्महत्या हा विषय अत्यंत गंभीर आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या ज्या संवेदना आहेत तशाच संवेदना सत्ताधारी पक्षाच्या आहेत. हा विषय कुठल्या विशिष्ट वर्गाच्या किंवा विशिष्ट पक्षाचा असूच शकत नाही. म्हणून या विषयावर चर्चा करण्यास राज्य शासनाची पूर्ण तयारी आहे. ही चर्चा कधी घ्यावी, कोणत्या नियमानुसार घ्यावी किंवा कोणत्या एका नियमाकडे बोट दाखवून त्या नियमावरच चर्चा करावी अशा प्रकारचा आग्रह माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी धरु नये. ही चर्चा कोणत्या नियमावर व्हावी केव्हा करावी हा महत्वाचा विषय नसून या विषयाला न्याय मिळावा ही आमची भुमिका आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यंनी तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत. या विषयाला न्याय देण्याची भूमिका स्वीकारतांना कोणत्या नियमाखाली चर्चा घ्यावी, चर्चा कधी घ्यावी हा अधिकार माननीय सभापती महोदयांना आहे. शासनाची या विषयावर चर्चा करण्याची तयारी आहे.

**सभापती** : या ठिकाणी विरोधी पक्ष नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा या विषयावर सदनात चर्चा व्हावी अशी भावना व्यक्त केलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती.........

मी सदनाला सांगू इच्छितो की, संसदीय कामकाजामध्ये प्रश्नोत्तराचा तास अतिशय महत्वाचा मानला जातो....

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे पूर्ण ऐकलेले आहे. त्यांनी उपस्थित केलेला विषय महत्वाचा आहे. त्याचबरोबर प्रश्नोत्तराचा तास देखील तितकाच महत्वाचा आहे असे माझे मत आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. यासंदर्भातील माझा निर्णय असा आहे की, आपण या विषयावर नियम 97 अन्वये अडीच तास चर्चा घेऊ. प्रश्नोत्तराच्या तासानंतर कामकाजपत्रिकेवरील अन्य कामकाज झाल्यानंतर दुपारी 4.00 वाजता या विषयावरील चर्चेस सुरुवात करु. आता मी प्रश्नोत्तराला सुरुवात करीत आहे.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मी सांगू इच्छितो की, त्यांनी कृपया खाली बसावे. मी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई बरोबरच पुणे, ठाणे व नागपूर या शहरांमध्ये**
**राबविण्यात येणारी झोपडपट्टी विकास योजना**

**(1) * 20315 श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत , डॉ. दीपक सावंत** : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) झोपडपट्टी विकासाची योजना मुंबई बरोबरच पुणे, ठाणे, नागपूर या शहरांमध्ये राबविली जाणार असल्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पुणे येथील झोपडपट्टीधारकांना किमान 350 चौ.फूटाचे घर देण्याचा शासनाचा विचार चालू आहे हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सद्या या योजनेअंतर्गत मुंबई येथील झोपडपट्टी धारकांनाही अनुज्ञेय असलेल्या 225 चौ.फूट घरांऐवजी 350 चौ.फूटाचे घर अनुज्ञेय करण्यात येणार आहे काय?

**श्री. विलासराव देशमुख** : (1) होय.

(2) नाही.

(3) नाही.

**( सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला नाही. )**

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शेगांव, जि.बुलढाणा येथील ऑटो रिक्षांना नवीन परवाने देण्याबाबत**

**(२) * २०३९२ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदीश गुप्ता :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव, जि.बुलढाणा या शहरात ३५० ऑटो रिक्षाधारक असून त्यातील फक्त ९० ऑटो परवानाधारक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेगांव हे श्री संत गजानन महाराजांचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता शासनाने २००१ मध्ये नवीन परवाने देण्याची मागणी मान्य केली तथापी यासंबंधीचा जो शासन निर्णय काढला त्यात नवीन ऑटो परवाने फक्त नवीन ऑटोलाच मिळले अशी अट घातली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही अट घातल्यामुळे १९८९ ते २००१ या कालावधीत ज्यांनी ऑटो खरेदी करुन आपला उदरनिर्वाह केला त्यांना शासनाच्या या निर्णयातील अटीमुळे रोजगारास मुकावे लागले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शासन निर्णयातील ती अट काढून ऑटो रिक्षा चालकांची व यात्रेकरुंची गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत वा करण्यात येत आहेत,

(५) अद्याप याप्रकरणी निर्णय घेतला नसल्यास, तो केव्हा घेण्यात येणार आहे ?

**श्री. विलासराव देशमुख** : (१) हे खरे नाही.

शेगांव, जि. बुलढाणा येथे ११६ ऑटोरिक्षा परवाना धारक आहेत.

(२) होय.

(३) व (४) दिनांक २२.७.१९९८ पासून संपूर्ण राज्यात ऑटोरिक्षांचे परवाने देणे बंद करण्यात आले. तथापि सन २००१ पासून फक्त ग्रामिण भागासाठी नवीन ऑटोरिक्षाना परवाने देण्याचे धोरण आहे. सन २००१ पूर्वी खाजगी संवर्गात नोंद केलेल्या ऑटोरिक्षा ह्या वैयक्तिक वापरासाठीच असल्यामुळे त्या ऑटोरिक्षांना परवाना देण्याचा सद्य:स्थितीत प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**<u>( सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला नाही. )</u>**

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईदर महापालिकेमार्फत करण्यात येणारा पाणीपुरवठा वाढवून मिळण्याबाबत**

**(3) * 20316 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुधाकर गणगणे** : सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या झपाटयाने वाढत असून महापालिकेमार्फत पुरविण्यात आलेला पाणी पुरवठा अपुरा असुन त्यामुळे पाणी टंचाई निर्माण होत असल्याने मिरा-भाईदर महापालिकेस अतिरिक्त 40 द.ल.ली. पाणी वाढवून मिळण्याबाबतचे निवेदन मा. लोकप्रतिनीधीनी दिनांक 31ऑक्टोंबर, 2006 रोजी व त्या सुमारास उद्योग विभाग यांना देण्यात आले होते हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.अशोक चव्हाण** : (1) होय.

(2) मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 9.11.2006 रोजी बैठक घेण्यात आली असून व्यापक स्तरावर चर्चा होण्यासाठी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्तरावर बैठक आयोजित करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. मा.मुख्यमंत्री यांच्या स्तरावर बैठक आयोजित करण्याची कार्यवाही चालू आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर महानगरक्षेत्रातील लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणारा पाणीपुरवठा फार अपुरा आहे. त्यामुळे तेथील जनतेला मोठ्या प्रमाणावर पाणी टंचाई जाणवत आहे. तेव्हा या बाबतीत शासन त्वरित निर्णय घेऊन मीरा-भाईंदर महानगर पालिकेला अतिरिक्त पाणी पुरवठा करणार आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा अपुरा आहे ही वस्तुस्थिती आहे. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, मीरा-भाईंदर महानगरपालिकेला 35 दशलक्ष लीटर प्रतिदिन पाण्याची आवश्यकता आहे. त्यामानाने मीरा-भाईंदर महानगरपालिकेला कमी पाणी पुरवठा होत आहे ही वस्तुस्थिती आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी सातत्याने सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. मीरा-भाईंदर महानगरपालिकेला एमआयडीसीच्या माध्यमातून बारवी धरणातून पाणी उपलब्ध व्हावे असा आमचा प्रयत्न आहे. पाटबंधारे विभागाने 35 दशलक्ष लीटर पाणी पाणी पुरवठा करण्याचे मान्य केलेले

..5.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण......

ता.प्र.क्र.20316.....

आहे. पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेली पाईपलाईन टाकण्यासाठी 3 कोटी रुपये खर्च येणार आहे. हा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करणार असून त्यांच्यामार्फत मीरा-भाईंदर महानगरपालिकेला पाणी पुरवठा केला जाणार आहे.

-------------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शासकीय अधिकाऱ्यांनी केलेला लाल दिव्यांचा गैरवापर**

**(४) * २१४८८ श्री. दिवाकर रावते , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर करण्यात आलेल्या हल्ल्यासाठी अतिरेकी, लाल दिवा लावलेल्या अँबेसॅडर गाडीने आले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पार्श्वभूमी लक्षात घेता राज्य परिवहन विभागाने दिनांक १२ जून ते ७ जुलै, २००६ दरम्यान केलेल्या तपासणीत पात्रता व परवानगी नसताना व राजशिष्टाचाराचा भंग करुन अनेक शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या गाड्यांवर लाल दिवे लावल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) सदर दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

**श्री.विलासराव देशमुख** : (१) होय.

(२) होय.

(३) सदर वाहनांवरील दिवे काढून टाकण्यात आले आहेत. कायद्याप्रमाणे एकूण रु.८,८००/- दंड वसूल करण्यात आला आहे.

**( सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला नाही. )**

-----------

..7.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**केंद्र शासन पूरस्कृत लहान व मध्यम शहराकरीता पायाभूत सुविधाचा विकास कार्यक्रम**

**(5) * 20327 प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , डॉ. एन. पी. हिराणी , श्री. सुधाकर गणगणे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहराकरिता पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमामध्ये (UIDSSMT) समाविष्ठ करण्यासाठी अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणी पुरवठा योजना हे दोन प्रकल्प अमरावती महानगरपालिकेने तयार केल्यानंतर महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाच्या वतीने तांत्रिक मान्यता प्रदान करुन नगरविकास संचालनालयास सादर केलेले आहेत हे खरे आहे काय,

(2) खरे असल्यास राज्यस्तरीय मान्यता समितीने हे प्रस्ताव अजूनही केंद्र शासनाकडे न पाठविण्याची कारणे काय आहेत,

(3) प्रधान सचिव (2) नगरविकास विभाग यांच्या दालनात दिनांक 28 सप्टेंबर, 2006 रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीमध्ये व त्या पूर्वीच्या पहिल्या बैठकीत मिळून एकूण राज्यातील किती व कोणकोणते प्रस्ताव मान्यता देवून उक्त कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत,

(4) पाठविलेल्या प्रस्तावात विदर्भातील कोणकोणते व किती प्रस्ताव समाविष्ट आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (1) अमरावती महानगरपालिकेने दिनांक 31/10/2006 रोजी नगर परिषद प्रशासन संचालनालय यांना सादर केला आहे.

(2) सदर प्रस्ताव नोडल एजन्सीकडे नुकताच प्राप्त झाला असून छाननी करण्यात येत आहे.

(3) पाणी पुरवठा व भुयारी गटार योजनेचे 16 प्रस्तावांना मान्यता देण्यात आली असून ते केंद्र शासनाकडे नोडल एजन्सीकडून पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(4) विदर्भातील 3 नगरपरिषदेचे खालीलप्रमाणे प्रस्ताव पाठविलेले आहेत.

1) पुसद नगरपरिषद जि.यवतमाळ, पाणीपुरवठा योजना.
2) भद्रावती नगरपरिषद, जि.चंद्रपूर पाणीपुरवठा योंजना.
3) सावनेर नगरपरिषद, जि.नागपूर भुयारी गटार योजना.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने एक सुधारणा करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "31.10.2006" ऐवजी "31.9.2006" असे वाचावे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणी पुरवठा योजना हे दोन प्रकल्प अमरावती महानगरपालिकेने तयार केलेले आहेत, त्यास शासन केव्हा मंजूरी देणार आहे ?

..8..

ता.प्र.क्र. 20327.......

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात पुढील महिन्यात स्टेट सॅक्शनींग कमिटीची बैठक घेण्यात येईल. त्यानंतर तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल.

---------

यानंतर श्री.पुरी....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकत्र घोषणा देत असतात. )

**सभापती** : अशा परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज पुढे चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.20 ते 12.35 पर्यंत स्थगित झाली. )

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी - माननीय सभापती)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, स्थगन प्रस्ताव स्वीकारुन त्याअंतर्गत शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर चर्चा घ्यावी, अशी मी पुन्हा एकदा आपल्याला विनंती करतो. हा शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न आहे, रोज शेतकरी मरत आहेत. शासनाने पॅकेज जाहीर करुन देखील शेतक-यांच्या हातात काहीही मिळालेले नाही. म्हणून माझी आपल्याला पुन्हा एकदा विनंती आहे की, विरोधी पक्षाने दिलेला स्थगन प्रस्ताव स्वीकारावा.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या नियम 289 खालील चर्चेसंबंधीचे म्हणणे मी या ठिकाणी शांतपणे ऐकले आणि त्यानंतरच मी माझा निर्णय या ठिकाणी दिलेला आहे. अत्यंत महत्वाची जी चर्चा होती ती नियम 97 खाली अडीच तासाची चर्चा मी मान्य केलेली आहे. ही अडीच तासाची चर्चा आजच्या कामकाजामधील सर्व विषय पूर्ण करुन 4 वाजता घ्यावयाची आहे. त्यामुळे विरोधी पक्षनेत्यांना माझी विनंती आहे की, आपण आपल्या सर्व सन्माननीय सदस्यांना जागेवर बसण्याबाबत सूचना करावी.

..2............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेतून वडाळ्याच्या आणिक-पांजरपोळपर्यंत नवीन रस्त्याच्या कामासाठी तयार करावयाचा सविस्तर प्रकल्प अहवाल**

**(६) * २२०७१ श्री. लक्ष्मण जगताप , प्रा. फौजीया खान , श्री.भास्कर जाधव , श्री. जितेंद्र आव्हाड तारांकित प्रश्न क्रमांक १८६४९ ला दिनांक १४ जुलै,२००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेतून वडाळ्याच्या आणिक-पांजरपोळपर्यंत नवीन रस्त्याच्या कामासाठी करण्यात येत असलेला सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाला आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री. विलासराव देशमुख यांच्याकरिता :** (१) होय.

(२) प्राप्त अहवालानुसार सदरहू रस्ता हा संग्रहालयापासून प्रारंभ होऊन शहीद भगतसिंग मार्ग, पी.डीमेला रस्ता, कर्नाक बंदरामधून जातो आणि ऑरेंज गेटकडे मुंबई पोर्ट ट्रस्टला मिळतो. हा रस्ता उंचावरील असून कर्नाक बंदरापासून सुरु होऊन आणिक जंक्शन येथील मुंबई पोर्ट ट्रस्ट पाईपलाईन गेट येथे त्याचा शेवट होतो. या उन्नत रस्त्याची एकूण अंदाजित लांबी एकूण ७.५ कि.मी. असून हा रस्ता चौपदरी राहील. नुकतेच, केंद्र शासनाच्या मंजूरी समितीने जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निर्माण अभियानांतर्गत या प्रकल्पास मंजूरी दिली आहे. निविदा कागदपत्रे तयार करण्याची कार्यवाही सुरु असून लवकरच निविदा मागविण्यात येतील.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यासंदर्भातील सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झालेला आहे तसेच निविदा कागदपत्रे तयार करण्याची कार्यवाही सुरु असून लवकरच निविदा मागविण्यात येतील, अशा प्रकारचे उत्तर शासनातर्फे देण्यात आलेले आहे. या प्रकल्पाची अंदाजे किंमत किती आणि हा प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रकल्पाची अंदाजित किंमत 336 कोटी रुपये असून 2 वर्षामध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्यात येईल.

-----------------

..3..........

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन गोल घेर धरुन वेलमध्ये फिरत असतात व घोषणा देत असतात.)

**मुंबईत नरिमन पॉईंट ते बोरीवली दरम्यान जलवाहतूकीस राज्यशासनाने सत्यगिरी शिपिंग कंपनीला दिलेली मान्यता**

**(७) * २०३५१ श्रीमती सुधा जोशी , श्री. संजय दत्त , श्री. यशवंतराव गडाख :** सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत नरीमन पॉंईट ते बोरीवली दरम्यान जलवाहतूकीस सत्यगिरी शिपिंग कंपनीला राज्यशासनाने माहे सप्टेंबर, २००६ च्या सुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, किती कालावधीत सदर प्रकल्प कार्यान्वित होणार आहे,

(४) तसेच सदर प्रकल्पामुळे समुद्राच्या पर्यावरणावर विपरीत परिणाम होणार नाही यासंदर्भात शासनाने कोणते धोरण निश्चित केले आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाने मे.सत्यगिरी शिपिंग कंपनीला कार्यादेश दिले आहे.

(२) मुंबई व मुंबई उपनगरासभोवताली नरिमन पॉईंट, बांद्रा,जुहू, वर्सोवा, मारवे व बोरीवली दरम्यान खाजगी उद्योजकांमार्फत बांधा, मालकी ,वापरा व परत करा या तत्वावर प्रवासी जलवाहतूक सुरु करणे.

(३) सवलतीचा करारनामा झाल्यानंतर दोन वर्षात.

(४) पर्यावरण व्यवस्थापन आराखडयाप्रमाणे विपरीत परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल.तसेच प्रकल्प केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या मान्यतेप्रमाणे राबविण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये प्रचंड गर्दीमुळे वाहतुक व्यवस्थेवर ताण पडत आहे. त्यामुळे नरीमन पॉईंट ते बोरीवली दरम्यान जलवाहतुक सुरु झाल्यास त्याचा फार चांगल्या पध्दतीने उपयोग होणार आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य हातात फलक घेऊन गोल घेर धरुन वेलमध्ये फिरत असतात व घोषणा देत असतात.)

**सभापती :** अशा पध्दतीने हातात फलक घेऊन वेलमध्ये फिरणे संकेतांमध्ये बसणारे नाही. सन्माननीय विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचा मान राखून त्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

**सभापती** : अशा परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.40 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर --- )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत ....**

श्री. पांडुरंग फुंडकर : आम्ही नियम 289 अन्वये, सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला सारून या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधात या सभागृहामध्ये चर्चा घडवून यावी म्हणून प्रस्ताव दिलेला आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या मोठ्या संख्येने आत्महत्या होत आहेत आणि म्हणूनच या गंभीर विषयावर या सभागृहामध्ये अन्य सर्व कामकाज बाजूला सारून प्राधान्याने चर्चा होणे आवश्यक आहे असे आमचे मत आहे, अशी आमची मागणी आहे. शेतकऱ्यांच्या कापसाला 2700 रूपये भाव मिळावा तसेच शेतकऱ्यांच्या धानाला 1 हजार रूपये भाव मिळावा यासाठी शेतकरी मागणी करीत आहे पण सरकार त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. परिणामी राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला आहे आणि त्यातूनच आतापर्यंत गेल्या वर्षभरामध्ये जवळपास एक हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, शेतकरी तेथे मरून पडलेले आहेत. परंतु या निर्दयी शासनाला त्याची कदर नाही. त्या विषयी सरकार येथे चर्चा घडवून आणीत नाही. म्हणूनच जोपर्यंत विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या, धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधात या सभागृहामध्ये चर्चा होणार नाही तोपर्यंत या सभागृहाचे कोठलेही कामकाज होणार नाही, आम्ही होऊ देणार नाही. म्हणून आम्ही आपल्याला विनंती करतो की, आधी या चर्चेला आपण प्राधान्य द्यावे आणि त्यासाठी सभागृहाचे अन्य सर्व कामकाज बाजूला सारावे ही आमची मागणी आपण मान्य करावी.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सभागृहाचे विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत आपल्याला माहिती दिलेली आहे. परंतु आपण येथे

( विरोधी पक्ष सदस्य कापडी फलक फडकावित 'वेल'मध्ये सभापती आसनासमोर घोषणा देत उभे राहतात ... )

येण्यापूर्वी आपल्या आसनावर माननीय सभापती आसनस्थ होते आणि त्यावेळेस या संबंधात माननीय सभापतींनी असा निर्णय दिलेला आहे की, 4 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज आटोपून घेतले जाईल आणि त्यानंतर ही चर्चा घेण्यात येईल. आणि या सभागृहाचे नेते माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील ही चर्चा मान्य केलेली आहे. तेव्हा सरकार या विषयावरील चर्चा घेत नाही असे नाही. ...

...... यू 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

सरकारने या विषयावर चर्चा घेण्याचे मान्य केलेले आहे आणि त्याप्रमाणे 4 वाजल्यानंतर ही चर्चा घेण्यात येणार आहे.

( विरोधी पक्ष सदस्य 'वेल'मध्ये कापडी फलक फडकावित घोषणा देत असतात ... )

**उपसभापती** : मी आता सभागृहापुढील कामकाज पुकारतो. आता सभागृहासमोर कागदपत्रे ठेवण्यात येतील. ....

( विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत असतात ... गोंधळ .. )

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पटबंधारे विकास महामंडळाचा (जळगाव) सन 2001-02 चा महालेखापाल-2 यांचा लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. गणेश नाईक (राज्य उत्पादन शुल्क मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो --

(अ) मुंबई दारूबंदी (विशेषाधिकार शुल्क) (सुधारणा) नियम 2004 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए 2002/प्र.क्र.10/रा.उ.शु.-2, दिनांकित 18 जून 2004.

(ब) मुंबई दारूबंदी (विशेषाधिकार शुल्क) (सुधारणा) नियम, 2005 प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए 2002/प्र.क्र.10/इएक्ससी-2, दिनांकित 20 जून 2005.

**उपसभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

( विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत असतात ... गोंधळ .. )

***

...... यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.**

( विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत असतात ... गोंधळ .. )

श्री.विलासराव शिंदे (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सहावा अहवाल (2005-06) सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

( विरोधी पक्ष सदस्य घोषणा देत असतात ... गोंधळ .. )

( यानंतर श्री.सरफरे ..... व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : ि-यम 93 अ-वये सूच-ा.

(माननीय विरोधी पक्षनेते व इतर माननीय विरोधी पक्षाचे सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात व कापडी बॅनर फडकवितात.)

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, पाशा पटेल, वि.प.स. यां-ी "केंद्र व राज्य शासनाने घोषित केलेल्या पॅकेजनंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या तीव्र होणे, शेतकऱ्यांना मदतीची रक्कम न मिळणे" या विषयावर ि-यम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो ि-यम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने ि-वेद-ा ज रावे.

(घोषणा)

(गोंधळ)

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य सर्वश्री.जयंत पाटील, शरद पाटील, वि.प.स. यां-ी "अलिबाग तालुक्याच्या परिसरात समुद्राच्या उधाणाच्या पाण्याच्या भरतीमुळे ठिकठिकाणचे बंधारे फुटून शेतजमिनी व पिकलेल्या भाताचे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे झालेले नुकसान" या विषयावर ि-यम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो ि-यम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने ि-वेद-ा ज रावे.

(घोषणा)

(गोंधळ)

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, मधु चव्हाण यां-ी "विदर्भ पाटबंधारे महामंडळातर्फे बेंबळा प्रकल्प, गोसीखुर्द कालवा व अंभोरा उपसा सिंचन योजना या प्रकल्पांच्या वाढीव निविदा न काढता गैरव्यवहाराने कामाचे वाटप करणे" या विषयावर ि-यम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो ि-यम 93 चा विषय होत -ासल्या-े, मी सूच-ेस अ-ुमती -ाज ारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने ि-वेद-ा ज रावे.

(घोषणा)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. प्रा. शरद पाटील, कपिल पाटील, जयंत पाटील, वि.प.स. यां-ी "मौजे वोळिंज (ता. वसई, जि.ठाणे) येथील सन 1983 पासून सुरु असलेले अपंग पुनर्वसन केंद्र बंद करण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे अपंगांचे होत असलेले नुकसान" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ेस अ-ुमती -ाजारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा जरावे.

(घोषणा)

(गोंधळ)

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यां-ी "शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे व कार्यकारी अध्यक्ष, श्री. उध्दव ठाकरे या दोघांना ठार मारण्यासाठी देण्यात आलेल्या धमकीचे पत्र" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ेस अ-ुमती -ाजारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा जरावे.

(घोषणा व गोंधळ)

**उपसभापती** : मा-ा-ीय सदस्य सर्वश्री. व्ही. यू. डायगव्हाणे, बी.टी. देशमुख, वसंतराव खोटरे, जी. एल. अैनापूरे यां-ी "आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळांना वेतन/वेतनेतर अनुदान मंजूर करणे" या विषयावर -ियम 93 अ-वये सूच-ा दिली आहे. तो -ियम 93 चा विषय होत -ासल्या-ो, मी सूच-ेस अ-ुमती -ाजारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने -िवेद-ा जरावे.

(घोषणा व गोंधळ)

व्ही 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

06-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) V 3
DGS/ KGS/ MAP/

**पृ.शी.**: कोल्हापूर जिल्हयातील 275 वस्ती शाळा शिक्षकांवर ओढवलेले बेकारीचे संकट

**मु.शी.**: कोल्हापूर जिल्हयातील 275 वस्तीशाळा शिक्षकांवर ओढवलेले बेकारीचे संकट यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री. शरद पाटील, जयंत पाटील, कपिल पाटील वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(घोषणा व गोंधळ)

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूर जिल्हयातील बारा तालुक्यातील डोंगराळ दुर्गम वाडयावस्त्यांतून उपेक्षित विद्यार्थ्यांना तळमळीने शिक्षण देणाऱ्या 275 वस्तीशाळा शिक्षकांवर ग्रामशिक्षण समिती जिल्हापरिषद व शासन हे वस्तीशाळांचे जबाबदारी स्विकारण्यास तयार नसल्याने शिक्षकांसमोर ओढवलेले संकट, वस्तीशाळा शिक्षकांना कमी करुन जिल्हापरिषदेच्या शिक्षकांच्या नेमणूका करण्याचा विचार असल्याने वस्तीशाळा शिक्षकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली जाणार असणे, वस्तीशाळा शिक्षकांना अधिकाऱ्यांच्या मर्जीवरच मानधनाची प्रतिक्षा करावी लागणे, त्यामुळे शिक्षकांना कौटुंबिक व आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागणे, या शिक्षकांकडून करारपत्र लिहून घेऊन ग्रामशिक्षण समितीमार्फत त्यांची निवड केली जाणे, वर्षातून केवळ त्यांना दोन हजार रुपये मानधनावरच समाधान मानावे लागणे, निम्मे शैक्षणिक सत्र संपले तरी पाचशे रुपयांप्रमाणेच दोनच महिन्याचे मानधन मिळणे, शासनाचा वेठबिगार नोकर म्हणून या शिक्षकांची गणना केली जाणे, त्यामुळे या शिक्षकांचे भवितव्य अधांतरी झाल्याने त्यांच्याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

श्री. हसन मुश्रीफ ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत.)

-----

**पृ.शी.**: बिगर सिंचनाच्या पाणीपट्टीच्या दरात शासनाने केलेली दरवाढ

**मु.शी.**: बिगर सिंचनाच्या पाणीपट्टीच्या दरात शासनाने केलेली दरवाढ यासंबंध डॉ. वसंत पवार, प्रा. फौजिया खान, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

(घोषणा व गोंधळ)

---

**पृ.शी.**: भिवंडी येथील पॉवरलूम वस्त्रोद्योग उत्पादनात वीजेच्या भारनियमनामुळे झालेली 50 टक्क्यांची घट

**मु.शी.**: भिवंडी येथील पॉवरलूम वस्त्रोद्योग उत्पादनात वीजेच्या भारनियमनामुळे झालेली 50 टक्क्यांची घट यासंबंधी श्री. संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

(घोषणा व गोंधळ)

---

**पृ.शी.**: मु.पो. देवरी (जि.भंडारा) येथे आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील खरेदी केलेले कोटयावधी रुपयांचे धान पावसाळयात सडून नष्ट होणे

**मु.शी.**: मु.पो. देवरी (जि.भंडारा) येथे आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील खरेदी केलेले कोटयावधी रुपयांचे धान पावसाळयात सडून नष्ट होणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, सय्यद पटेल,जगदीश गुप्ता, सागर मेघे, नितीन गडकरी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

(घोषणा व गोंधळ)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: गारपिटीमुळे विदर्भातील संत्रा बागायतीचे झालेले प्रचंड नुकसान

**मु.शी.**: गारपिटीमुळे विदर्भातील संत्रा बागायतीचे झालेले प्रचंड नुकसान यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय दत्त, रमेश निकोसे, सुरेश जेथलिया, गोपीकिशन बाजोरिया, अरविंद सावंत, रणजितसिंह मोहिते-पाटील, वसंतराव चव्हाण, वसंत पवार, जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी, सदाशिवराव पोळ, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री राजेंद्र जैन, एन.पी. हिराणी, शरद पाटील, जयंत पाटील, कपिल पाटील यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

(लक्षवेधी सूचना मांडण्यात आली नाही.)

(घोषणा व गोंधळ)

**उपसभापती** : सभागृहाचे कामकाज दुपारी 1.30 वाजेपर्यंत मी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.08 ते 1.30 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ 12:45

(स्थगितीनंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झालेल्या आहेत असे माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटले असल्याची बातमी आजच्या "दैनिक सकाळ"मध्ये आलेली आहे. सभापती महोदय, जाहीर केलेले पॅकेज फेल गेलेले आहे, असे मला सांगावयाचे आहे. त्यावर चर्चा झाली पाहिजे, अशाप्रकारची पुन्हापुन्हा विनंती केली. शेवटी सभागृहाचे नियम हे सदस्यांसाठी असतात. 'खास बाब' म्हणून नियम सस्पेंड करण्याचा सभागृहाला अधिकार आहे. ज्या शेतकऱ्यांच्या नावाने कुंकु लावून सर्व शेतकऱ्यांचे जे प्रतिनिधी येथे बसतात, त्यांच्यासाठी नियम आहेत की आणखी कोणासाठी ? असा प्रश्न पडतो. या संदर्भातील नियम बाजूला ठेवून नियम 289 अन्वये प्रस्तावावर चर्चा करण्याची आपण परवानगी द्यावी. विदर्भामध्ये दर सहा तासांनी शेतकऱ्याच्या आत्महत्या होत आहेत. त्या संदर्भाने या सभागृहामध्ये चर्चा झाली नाही तर ते योग्य होणार नाही. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, या संबंधातील काहीही नियम असले तरी ते सस्पेंड करून 289 अन्वये प्रस्तावावर चर्चा करण्याची आपण परवानगी द्यावी, अशी पुन्हा एकदा विनंती करतो.

**उपसभापती** : मी या विषयावर चर्चा करण्यास परवानगी देत नाही असे नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण या विषयावर चर्चा करण्यास परवानगी द्यायला तयार आहात परंतु आपण या विषयावर 289 अन्वये प्रस्ताव मंजूर करुन चर्चा करावी, अशी आमची मागणी आहे. अनेकवेळा पोलिसांकडून गोळीबार केला जातो, त्यावर अशा प्रस्तावाद्वारे चर्चा होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सर्वात महत्वाच्या विषयावरील 289 अन्वये प्रस्तावाच्या चर्चेला आपण परवानगी देऊ नये, हे योग्य नाही. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, सर्व नियम बाजूला सारून आपण या विषयावरील 289 अन्वये प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी परवागी द्यावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, नियम 32 अन्वये कसा प्रस्ताव स्वीकारावा की स्वीकारू नये, याबाबतचा अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांना आहे. या विषयावर 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हा 289 अन्वये प्रस्ताव देण्यामागे आमचा काही हेतू आहे. सदनातील सगळ्या सदस्यांना शेतकऱ्यांबद्दल प्रेम आहे की नाही, शेतकऱ्यांच्या हक्काचे रक्षण करण्याची जबाबदारी आहे, असे सांगितले जाते. तेव्हा या स्थगनप्रस्तावावर जर मतदान झाले तर त्या बाजूचे सन्माननीय सदस्य पाठिंबा देण्यासाठी उभे रहातात की नाही, हे पहायला मिळेल, याच कारणास्तव



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू....

हा 289 चा प्रस्ताव नाकारला जात असेल तर ते बरोबर नाही. नियम 97 प्रमाणे आम्ही चर्चा मागू शकलो असतो, परंतु तसे न करता आम्ही 289 अन्वये चर्चा मागतो आहोत. याचे कारण देखील स्पष्ट करु शकतो, ते न करण्याचे कारण नाही. पण 289 अन्वयेचा प्रस्ताव म्हणून तो स्वीकारला जावा असा आमचा आग्रह आहे. तसा तो स्वीकारला जावा. शेवटी पीठासीन अधिकारी हे शेतकरीच आहेत. शेतकऱ्यांबद्दल त्यांना आपुलकी आहे, प्रेम आहे, आपण शेतकऱ्यांच्या कुटुंबातून आलेला आहेत, तेव्हा ही न्याय मागणी मान्य करावी, अशी विनंती आहे. या संदर्भाने कोणते पाऊल उचलायचे त्याबाबत शासन निर्णय घेईल, त्याबद्दल काही म्हणायचे नाही. शासन फक्त घोषणा करते. आपल्याला कल्पना आहे की. 1,075 कोटी रुपयाचे पॅकेज माननीय मुख्यमंत्री यांनी सदनामध्ये जाहीर केलेले होते.

यानंतर श्री.बरवड.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

त्यापैकी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना काय मिळाले याची सर्वत्र चर्चा होत आहे. केवळ घोषणा नको. केवळ पॅकेज नको. याबाबतीत असा काही इलाज करावा जेणेकरुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. म्हणून या चर्चेची आवश्यकता आहे हे मला आग्रहाने सांगावयाचे आहे. आम्हाला या सभागृहाचे कामकाज थांबविण्यामध्ये, या ठिकाणी उभे राहून धोषणा देण्यामध्ये, या ठिकाणी उभे राहून अशा पध्दतीचे वातावरण निर्माण करण्यामध्ये कोणताही आनंद वाटत नाही. केवळ शेतकऱ्यांचा प्रश्न धसास लागावा या दृष्टीकोनातून आम्ही हा आग्रह धरत आहोत. आपण त्याला साथ द्यावी अशी मी आपल्याला सर्व सन्माननीय सदस्यांमार्फत विनम्र विनंती करतो.

**उपसभापती** : पहिली बाब अशी की, अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून नियम 97 अन्वये ही चर्चा घेण्याचा निर्णय यापूर्वीच माननीय सभापतींनी घेतलेला आहे. माननीय सभापतींनी घेतलेल्या निर्णयावर या ठिकाणी वेगळी चर्चा करणे योग्य ठरणार नाही. म्हणून मी आपल्याला अशी विनंती करतो की, सभागृहासमोर जे कामकाज आहे ते आपण आधी पूर्ण करु आणि त्यानंतर या विषयावर चर्चा सुरु करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तशी चर्चा उपस्थित करता येते पण सभापती महोदय, नियमाला अपवाद असतो...

**उपसभापती** : आपल्याला चर्चा करण्यास कोणी नाही म्हटलेले नाही. सभागृहाचे आजचे राहिलेले कामकाज संपल्यानंतर ही चर्चा घेत आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम कोणासाठी आहेत ? हा नियम आपण सस्पेंड करु शकत नाही काय ? राज्यातील शेतकरी मरत आहेत. त्यांच्या प्रश्नासंबंधी जर या ठिकाणी चर्चा केली नाही तर आपण शेतकऱ्यांशी प्रतारणा केल्यासारखे होईल. प्रत्येक गोष्टीला नियम लावून चालणार नाही. हा नियम बाजूला करुन नियम 289 अन्वये या ठिकाणी चर्चा झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे. आपण नियम 97 अन्वये चर्चेला परवानगी देण्यास तयार असाल तर आमचा असा सवाल आहे की, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांसारखी व्यक्ती सुध्दा आत्महत्या घटल्या असे वक्तव्य करीत असेल आणि शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

चालू असेल तर हे नियम बाजूला केले पाहिजेत आणि खऱ्या अर्थाने चर्चा झाली पाहिजे अशी आमची आग्रहाची मागणी आहे. सभापती महोदय, मी पुन्हा आपल्याला विनंती करतो. या ठिकाणी या विषयावर नियम 97 अन्वये चर्चा न करता नियम 289 नुसार चर्चा झाली पाहिजे असा आमचा आग्रह आहे व तसा आग्रह राहणार आहे. मी पुन्हा आपल्याला विनंती करतो, आपण पुन्हा फेरविचार करुन या चर्चेला परवानगी द्यावी.

**उपसभापती** : मी आपल्याला सांगितले की, माननीय सभापतींनी यावर निर्णय दिलेला आहे. त्यावर आपण पुन्हा चर्चा करणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे मी आपल्याला पुन्हा एकदा विनंती करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण त्या निर्णयावर फेरविचार करावा. हा अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे.

**उपसभापती** : आपण आपल्या मागणीचा फेरविचार करावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रत्येक गोष्ट नियमानुसार झाली पाहिजे हे मान्य आहे परंतु कोठे तरी नियमाला अपवाद करुन माननीय सभापतींनी जो निर्णय दिलेला आहे त्यावर फेरविचार करावा अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : एकदा माननीय सभापतींनी निर्णय दिल्यानंतर त्यावर चर्चा करणे बरोबर होणार नाही. यानंतर विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील. आज मांडावयाच्या विशेष उल्लेखाच्या सूचना देणारे सदस्य आता सभागृहात उपस्थित दिसत नाहीत. त्यामुळे यानंतर शासकीय विधेयके घेण्यात येतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ. शी.** : रोजगार हमी सुधारणा विधेयक.

**मु. शी.** : L.C.BILL NO.XXI OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT,1977).

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( रोजगार हमी योजना राज्यमंत्री ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 21 - महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 11 ( दोन्ही सम्मिलित ), अनुसूची विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि. प. वि. क्रमांक 21 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

**उपसभापती** : सन 2006 चें वि. प. वि. क्रमांक 21 संमत झाले आहे.

----

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मजकूर लिहिलेले कापडी फलक हातात घेऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

**पृ.शी.** : मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक

**L.C. BILL NO. XXII.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.)**

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : उप सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006चे वि.प.वि. क्रमांक 22 मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1957 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 10 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. रणजित कांबळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 22 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन 2006चे वि.पि.वि. क्रमांक 22 संमत झाले आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>अर्धा-तास चर्चा</u>**

**पृ.शी.**: सन 1999-2000 या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता 5 वी ते 9 वी या वर्गात शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण हा विषय शिकविण्याची शासनाने केलेली घोषणा

**मु.शी.**: सन 1999-2000 या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता 5 वी ते 9 वी या वर्गात शिकणा-या विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण हा विषय शिकविण्याची शासनाने केलेली घोषणा यासंबंधी प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मजकूर लिहिलेले कापडी फलक हातात घेऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

( अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यात आली नाही.)

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न

**मु.शी.**: उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा अनेक वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन मजकूर लिहिलेले कापडी फलक हातात घेऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

(अर्धा-तास चर्चा उपस्थित करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 2.00 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 1.43 ते 2.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---

... नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्याला पुन्हा विनंती करण्यासाठी उभा आहे. विधानपरिषद नियम 289 अन्वये आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे तो प्रस्ताव मान्य करुन आम्हाला याठिकाणी चर्चेला परवानगी द्यावी. या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीचा प्रश्न आहे. माननीय पंतप्रधान व मुख्यमंत्र्यांनी विदर्भासाठी पॅकेज जाहीर केल्यानंतरही विदर्भात 1000 पेक्षाही जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून हे आत्महत्यांचे सत्र सुरुच आहे. हा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाही.

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 02 वाजून 02 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी स्थगित झाली)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : मी विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती करतो की त्यांनी नियम 97 अन्वये चर्चेला सुरुवात करावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आम्ही नियम 97 अन्वये चर्चा उपस्थित करुच शकत नाही. नियम 97 असे सांगतो की, "निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या एखाद्या बाबीवर चर्चा उपस्थित करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही सदस्यास ज्या बाबीसंबंधी चर्चा उपस्थित करावयाची असेल ती बाब स्पष्टपणे व नेमकेपणाने निर्दिष्ट करणारी लेखी सूचना सचिवांकडे देता येईल."

सभापती महोदय, आम्ही नियम 97 अन्वये लेखी सूचना दिलेली नसून आम्ही नियम 289 अन्वये लेखी सूचना दिलेली आहे. त्यामुळे नियम 97 अन्वये चर्चा होऊच शकत नाही. नियम 289 अन्वये चर्चा करण्याची आम्ही आपल्याकडे परवानगी मागत आहोत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

आपण नियम 97 अन्वये चर्चा सुरु करावी असे सांगितले. परंतु मला आपणास सांगावयाचे आहे की, आमच्यापैकी कोणत्याही सदस्यांनी नियम 97 अन्वये सूचना दिलेली नाही. त्यामुळे नियम 97 अन्वये चर्चा सुरु होऊ शकत नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. खरे म्हणजे नियम 97 अन्वये चर्चा सुरु करायची असल्यास त्यासाठी अगोदर सदस्यांकडून तशी सूचना यावी लागते. सदस्यांना नियम 97 अन्वये सूचना द्यावयाची असल्यास त्याप्रमाणे ते आपल्याकडे सूचना देतात. त्यानंतर त्या सूचनेची छाननी झाल्यानंतर कोणती सूचना स्वीकारण्यात आली आहे, कोणती नाकारण्यात आली याचा निर्णय या सभागृहात सांगितला जातो. आम्ही दिलेली सूचना आपण नियम 97 मध्ये कन्व्हर्ट केली. पण त्याबाबतीतील सोपस्कार देखील पूर्ण झालेले नाहीत. त्यामुळे नियम 97 खाली चर्चा सुरु होऊ शकत नाही. माझी सदनाला नम्रपणे विनंती आहे की, नियम 289 नुसार आम्ही सूचना दिलेली आहे. ती सूचना मान्य करुन आपण चर्चेला सुरुवात करावी. जर आपल्याला नियम 97 अन्वये चर्चा सुरु करावयाची असेल तर आपल्याकडे दुसऱ्या दिवशी नियम 97 अन्वये सूचना आल्यास त्या संदर्भातील सोपस्कार पूर्ण करुन त्याप्रमाणे चर्चा सुरु करावी. या संदर्भातील निर्णय माननीय पीठासीन अधिकारी घेऊ शकतील असे मला नम्रपणे सुचवावेसे वाटते.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी नियम 289 वाचून दाखविला. त्या नियमामध्ये असे म्हटलेले आहे, "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करताना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल." यावरुन असे दिसते की, एखादा नियम स्थगित करण्यासंदर्भातील हा नियम आहे. एखाद्या विषयावरील चर्चा करावयाची असल्यास त्या संदर्भात दुसरे नियम आहेत. त्यामुळे माननीय विरोधी पक्ष सांगत आहे की, आम्हाला नियम 289 अन्वये चर्चा करायची आहे, त्याचे हे म्हणणे पुरेसे योग्य नाही असे मला वाटते. नियम 289 हा नियम स्थगित करण्यासंदर्भातील नियम आहे. एखाद्या विषयावर चर्चा करण्यासंदर्भातील नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयानी जे सांगितले ते खरे आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, नियम 289 मांडल्यानंतर तो सभागृहासमोर मताला यावा लागतो. सरकारने जर हा नियम फेटाळला तर आम्ही कोणत्याही नियमाखाली या विषयावर चर्चा करु. परंतु याठिकाणी सत्ताधारी पक्षाने मतदान नाकारलेले आहे. माझी आपणास आग्रहाची विनंती आहे की, आपण नियम 289 चा प्रस्ताव मतास टाकावा तर जो प्रस्ताव फेटाळला गेला तर आम्ही कोणत्याही नियमाखाली चर्चा करण्यास तयार आहोत.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, एखाद्या विषयावर त्वरीत चर्चा करावयाची असेल तर सभागृहापुढील कामकाज बाजुला ठेवून, नियम स्थगित करुन त्यावर चर्चा करता येते. प्रश्न असा आहे की, या क्षणाला त्यांनी चर्चेची मागणी केलेली आहे आणि आम्ही त्यास तयार आहोत. त्यामुळे नियम स्थगित कशासाठी करायचा ? त्यांना कोणत्या नियमाखाली चर्चा करायची आहे ते सांगून त्यांनी चर्चेस सुरुवात करावी. सभापती महोदय, राज्यात होत असलेल्या शेतकऱ्याच्या आत्महत्या हा अत्यंत गंभीर विषय आहे. तेव्हा त्या विषयावर आपण चर्चा करु या. तांत्रिक बाबीमध्ये जाण्याऐवजी..........

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न असतात. )

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : आपण काय साध्य करणार आहात ? आपल्याला कुठला नियम स्थगित करावाचा आहे ? आपल्याला कुठले कामकाज स्थगित करावयाचे आहे ? आपल्याला प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावयाचा आहे का ? आपल्याला कॉलिंग ॲटेंशनचे कामकाज स्थगित करावयाचे आहे का ? आपल्याला कोणते कामकाज स्थगित करावयाचे आहे ? सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे आजच्या कामकाजपत्रिकेवरील सर्व कामकाज संपलेले आहे. त्यामुळे याठिकाणी कुठल्याही प्रकारचा नियम स्थगित न करता चर्चेला सुरुवात करणे योग्य होईल, असे मला वाटते.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी विरोधी पक्षनेत्यांनी अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर नियम 289 खाली चर्चा मागितली आहे. मी नियमात जाऊ इच्छित नाही. याठिकाणी सभागृहाची प्रथा अशी आहे की, ज्यावेळी नियम 289 खाली चर्चा स्वीकारावयाची असते त्यावेळी सभागृहापुढील बाकीचे कामकाज बाजूला सारुन तात्काळ या विषयावर चर्चा करावी अशी प्रथा आहे. याठिकाणी नियम वेगळा आहे, परंतु प्रथा अशी आहे. ज्यावेळी याठिकाणी पीठासीन अधिकारी म्हणून माननीय सभापती महोदय होते त्यावेळी त्यांनी या विषयावरील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे एकून घेऊन व यासंबंधी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे व माननीय मुख्यमंत्र्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांनी असा निर्णय दिलेला आहे की, ही चर्चा मी स्वीकारतो परंतु आजच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाज पूर्ण झाल्यानंतर दुपारी 4.00 वाजता या चर्चेला आपण सुरुवात करु. अशाप्रकारचा त्यांनी निर्णय दिलेला आहे. तसेच, आजच्या कामकाजपत्रिकेवरील सर्व कामकाज आटोपले असल्यामुळे आता याठिकाणी नियम 289 हा अस्तित्वात राहिलेला नसल्यामुळे या नियमान्वये आता चर्चा होऊ शकत नाही. कारण, आता कुठल्याही प्रकारचे कामकाज शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे आपण आता नियम 97 खाली चर्चेला सुरुवात करावी.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आत्महत्येचा प्रश्न महाराष्ट्रात विशेषत: विदर्भाच्या सामाजिक जीवनामध्ये अत्यंत अस्वस्थता निर्माण करुन सोडणारा आहे. सभागृहामध्ये त्यावर चर्चा झाली पाहिजे, याविषयी माझ्या मनात दुमत नाही. आम्ही सर्व प्रतिनिधी लोकांमध्ये काम करीत असल्यामुळे त्यांच्या भावना काय आहेत, हे आम्हाला याठिकाणी मांडावयाचे आहे. नियम 97 आणि देण्यात आलेला प्रस्ताव यामध्ये कंसीडर्ड आणि 289 मध्ये रिझॉल्वड असा फरक आहे. विचारात घेण्यात यावे हे म्हणणे वेगळे आहे, ते विचारात घेतले असे होते. रिझॉल्वड म्हणजे तीव्र चिंता

..2...

प्रा.बी.टी.देशमुख....

व्यक्त करताना प्रत्येक सदस्याला मतदान करता येते त्यामुळे त्याची तीव्रता ही जास्त असते. म्हणून आपण अनेकदा हे मान्य करतो की, चर्चा ही सभागृहामध्ये झाली पाहिजे. ती कोणत्या नियमाखाली घ्यावी ते आपण नियमाप्रमाणे ठरवावे. त्या चर्चेमध्ये मी भाग घेणार आहे. आता आपण कोणत्या टप्प्यावर आलो आहोत. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यावर काय निर्णय द्यायचा तो आपण द्यावा. नियमानुसार 97 ची नोटीस देण्यात आलेली नसताना आपण ते मान्य करु शकतो का ? दुसरा मुद्दा दुर्देवाने असा निर्माण झालेला आहे की, कामकाज संपलेले असल्यामुळे कामकाज स्थगित करण्यात यावे व याबाबत चर्चा करण्यात यावी असे जे सायटेशन आहे, त्याचे काय ? आता कामकाज काहीच शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे या विषयाला न्याय देण्याच्या दृष्टीने आपण निर्णय द्यावा आणि या विषयी चर्चा सुरु करावी, असे मला व्यक्तिशः वाटते.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MAP/ KTG/ प्रथम श्री.पुरी....... 14:25

**(सभापतीस्थानी - माननीय सभापती)**

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सकाळी जो प्रस्ताव मांडला व त्यावर जे मत मांडले त्यामध्ये आणि आताच्या मतामध्ये काहीही फरक पडलेला नाही. तो प्रस्ताव मांडतांना त्याची ग्रॅव्हिटी होती ती आताही तशीच आहे. सन्माननीय मंत्रीमहोदय, श्री.छगन भुजबळ यांनी जो तांत्रिक मुद्दा या ठिकाणी मांडला आहे तो बरोबर आहे. परंतु, मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, नियम 289 खाली जो प्रस्ताव देण्यात येतो व त्या अनुषंगाने जी सूचना दिलेली असते त्या सूचनेवरच चर्चा होत असते. केवळ नियम 289 खाली प्रस्ताव मांडल्यानंतर कामकाज स्थगित करा आणि दुस-या एखाद्या नियमाखाली चर्चा घ्या असा त्याचा अर्थ होत नाही. त्याच नियमाखाली चर्चा घ्यावयाची असते. अन्यथा, त्या विषयाची ग्रॅव्हिटी निघून जाते. नियम 289 अन्वये मतदान होते तर नियम 97 अन्वये मतदानाची आवश्यकता नसते. नियम 97 खाली केवळ 'विचारात घेण्यात यावे' असे सायटेशन असते तर नियम 289 अन्वये ठराव पारित करण्यात येतो. हाच फरक या ठिकाणी महत्वाचा आहे. सर्वच सभागृहाला शेतक-यांची चिंता आहे, या सभागृहाला भय आहे, तीव्र नापसंती व्यक्त करण्यात येत आहे, हे सर्व व्यक्त करण्यासाठी नियम 289 चा आधार घेतलेला असतो. त्यासाठी नियम 97 हे माध्यम नाही. विरोधी पक्षाच्या सदस्यांकडून किंवा सभागृहातील कुणाही सदस्यांकडून नियम 97 ची मोशन दिलेली नाही. तुमच्या तशा डायरेक्टिव्हज् असतील तर नियम 289 खाली आलेला प्रस्ताव मतास टाकावयास हवा होता. परंतु, तशा पध्दतीने तो प्रस्ताव मतास टाकला गेला नाही, सर्व कामकाज रेटून नेण्यात आले. एकदा नियम 289 खाली प्रस्ताव दिल्यानंतर विरोधी पक्षाला दुस-या एखाद्या नियमाखाली प्रस्तावावर चर्चा घेण्याबाबत विचारण्याची आवश्यकता नसते परंतु सकाळी जाणुनबुजून विचारण्यात आले. त्याऐवजी तो प्रस्ताव मतास टाकावयास हवा होता. त्यामुळे यासंदर्भात न्याय झालेला नाही, असे वाटते. त्यामुळे मी या ठिकाणी पुन्हा एकदा विनंती करतो की, नियम 289 खाली दिलेला प्रस्ताव मान्य करुन त्याच प्रस्तावानुसार चर्चा सुरु करावी.

..2...........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्री, श्री.छगन भुजबळ यांनी तांत्रिक मुद्दा उपस्थित केला. त्यांनी असे सांगितले की, आता आजच्या दिवसाचे कोणतेही कामकाज राहिलेले नाही. परंतु, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी अर्धा तास चर्चेच्या सूचना दिल्या होता, ते सभागृहात उपस्थित होते, त्यावेळी दुस-या सन्माननीय सदस्यांना का बोलू दिले गेले ? राज्य तर्कावर चालत नाही, भावनेवरही चालते. सन्माननीय मंत्रीमहोदयांचा तर्क बरोबर आहे. माझी विनंती आहे की, त्यांनी नियम 289 खाली दिलेल्या प्रस्तावावर मतदान घ्यावे, सरकारी पक्ष मतदानाला का घाबरत आहे ? सकाळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, हा कोणत्याही पक्षाचा विषय नाही, समुहाचा विषय नाही, भागाचा विषय नाही. राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या गंभीरपणे घेण्याचा हा विषय आहे. मग तुमचाच एवढा तांत्रिक आग्रह का आहे ? सरकारने नियम 289 खाली चर्चा घ्यावी. सरकार विरोधी पक्षाबरोबर शेतक-यांच्या भावनेमध्ये सहभागी आहे, असे म्हणून आमच्याबरोबर मतदान करा, अशी माझी आग्रहाची विनंती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, नियम 289 अन्वये विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव मांडला त्यावेळी आपण स्पष्टपणे रुलिंग दिलेले आहे. हे रुलिंग असे दिलेले आहे की, आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील कामकाज संपल्यानंतर दुपारी 4.00 वाजता चर्चा घेण्यात येईल. आता सर्व कामकाज संपलेले आहे. चर्चा सुरु करण्यास एवढा विलंब का होत आहे ? त्यामुळे हा तांत्रिक मुद्दा बाजूला ठेवावा. आताची परिस्थिती अशी आहे की, कामकाज सर्व संपलेले आहे, चर्चा सुरु होणे आवश्यक आहे. दोन्ही बाजुच्या सदस्यांनी ते मान्य केलेले आहे. त्यामुळे आता तांत्रिक मुद्यावर न जाता चर्चेला ताबडतोब सुरुवात करावी, अशी विनंती करतो व माननीय सभापतींकडे तसा आग्रह धरतो.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृह सुरु झाल्यानंतर मी ज्यावेळी प्रश्नोत्तराचा तास पुकारला त्यावेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 289 खाली प्रस्ताव दिला व त्यांनी आपल्या भावना येथे मांडल्या. आजचे सर्व कामकाज तहकूब करुन या प्रस्तावावर चर्चा करावी असे त्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार साहेबांनीही भावना मांडल्या. त्यानंतर मी सत्तारुढ पक्षाला विचारले. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित होते. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारले की, याबाबत तुमच्या काय भावना आहेत ? त्यांनी असे सांगितले की, आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. आत्महत्या आणि अन्य प्रश्नांशी निगडीत आहे. कोणत्याही वेळी, तुम्ही वेळ द्याल त्यावेळी आम्ही चर्चा करण्यास तयार आहोत. त्यानंतर मी नियम 289 च्या अनुषंगाने उपलब्ध असणा-या तरतुदींचा विचार करीत असतांना नियम 23 मध्ये एखाद्या विशिष्ट बाबीवर एखादा प्रस्ताव असेल तरच त्याबाबतीत शक्यतो आपण चर्चा घेतो. या ठिकाणी एकूण 6-7 मुद्दे आहेत. पहिला मुद्दा राज्यामध्ये झालेल्या आत्महत्या संदर्भातील आहे. त्याचबरोबर अन्य 5-6 मुद्दे आहेत ते सुध्दा महत्वाचे आहेत. याबाबतचे दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकल्यानंतर मी असा निर्णय घेतला की, मी नियम 289 स्वीकारीत नाही. अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळे कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज संपले आणि न संपले तरीही मी ही चर्चा 4.00 वाजता स्वीकारीत आहे. मी ही चर्चा नियम 97 खाली स्वीकारलेली आहे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊ घोषणा देत असतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेजी मी बोलत आहे. मी असे सांगितले की, नियम 97 खाली चर्चा स्वीकारलेली आहे. नियम 289 खाली केलेली विनंती मी स्वीकारलेली नाही. पर्याय या दृष्टीने मी नियम 97 खाली ही चर्चा दिलेली आहे आणि त्या निर्णयावर मी ठाम आहे. त्याचवेळी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मतदान मागितले असते तर मी मतदान सुध्दा दिले असते आणि म्हणून या ठिकाणी चर्चा ही नियम 97 खालीच होईल. मतदान आपण त्यावेळी मागितले असते, विरोधी पक्ष नेत्यांनी त्यावेळी ती मागणी केली असती तर ती नियम 289 ची सूचना मी मताला टाकली असती. त्यावेळी विरोधी पक्षाने अशी मागणी केली नाही. त्यामुळे यावर मतदान, विभाजन नाही. म्हणून मी नियम 97 खाली दिलेला हा निर्णय आहे. माझी विनंती आहे की, आपण नियम 97 खाली चर्चा घ्यावी. या ठिकाणी नियम 289 चा प्रस्ताव मी मान्य केलेला नाही.

...2/-

**सभापती** ........

सदनाच्या भावना विचारात घेऊन मी सांगितले की, अडीच तासाची चर्चा देण्यास तयार आहे. त्यावेळी मतदान मागितले असते तर मतदान नक्की दिले असते. यावर मी माझा निर्णय दिलेला आहे. मत विभाजनाची मागणी न आल्यामुळे मी हा निर्णय दिलेला आहे. नियम 289 ची मागणी केलेली आहे त्याला मी संमती देत नाही. पण अत्यंत महत्वाचा विषय म्हणून या सदनामध्ये नियम 97 अन्वये अडीच तासाची चर्चा मी देण्यास तयार आहे असे मी ज्यावेळी सांगितले त्यावेळी मत विभागणी दिली असती. आता हा निर्णय मी पूर्ण केलेला आहे. चर्चा नियम 97 खालीच होईल.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/KTG. श्री. बोरले नंतर --- 14:35

**सभापती** ....

अन्य जे काही हेत्वारोप येथे केले गेले असतील ते रेकॉर्डवरून काढून टाकण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या बाजूकडून देण्यात आलेला नियम 289 खालील प्रस्ताव मी स्वीकारलेला नाही. पण त्यामधून जो अत्यंत महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आपण उपस्थित करू पहात होता, त्यावर चर्चा व्हावी म्हणून नियम 97 खाली चर्चा देण्याचा निर्णय मी दिलेला आहे. त्यावेळेसच आपण मतदानाची मागणी केली असती तर जरूर तेव्हा त्याबाबत विचार करता आला असता. परंतु आपल्याकडून तशी मागणीही आलेली नव्हती. ....

( विरोधी पक्ष सदस्य मा. सभापतींच्या आसनापुढे उभे राहून घोषणा देत असतात ... गोंधळ ... )

सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी आपल्याला सांगू इच्छितो की, मला माझ्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे माहिती आहेत. या सदनामध्ये सभापती म्हणून काम करीत असताना मला माझ्या जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव आहे आणि मी केव्हाही पक्षपात केलेला नाही. तेव्हा तुम्ही असे म्हणावे हे बरोबर नाही. आपण स्वत:ही सभागृहाचे नियम 289, नियम 97 आणि नियम 93 वाचून पहावेत. .... मी ही चर्चा आता घेणारच आहे. मा ा ती नियम 97 खाली सुरू होईल. .... ( गोंधळ ) ... मी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना पुन्हा सांगू इच्छितो की, त्यांनी अशा प्रकारे हेत्त्वारोप करणे योग्य नाही. आपण एक ज्येष्ठ सदस्य आहात. आपण कशा रीतीने बोलत आहात ... त्याला आता काय अर्थ आहे ... ? ... सभागृहाचा डेकोरम आपण सर्वांनीच पाळला पाहिजे, टिकविला पाहिजे. .... मी हे कशासाठी घेत आहे ? मी येथे कोणाचीही बाजू घेत नाही. ... मी सकाळीच नियम 289 खाली चर्चा मी येथे स्वीकारणार नाही असे सांगितले आहे. त्याचवेळेस आपण यावर मतदान मागितले असते तर मी तेही दिले असते. पण आपण तसे काही मागितले नाही. तेव्हा तो विषय त्या ठिकाणी संपला. मी माझा त्या विषयीचा निर्णय दिल्यावर आपण शांतपणे बसला आणि त्यानंतर आता दोन अडीच तासांनी आपण यावर मतदानाची मागणी करीत आहात, हे बरोबर नाही. .... मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, मी कधीही आपल्याला बोलण्यास अडविले नाही, ज्या ज्यावेळेस आपण बोलण्याची इच्छा प्रकट केली त्या त्यावेळी मी आपल्याला बोलण्याची संधी दिलेली आहे. ...

...... एफएफ 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (माननीय सभापतींच्या आसनापुढे उभे राहून...) : पण आम्ही जे मागितले नाही ते आपण आम्हाला कशासाठी देत आहात ? .... ( गोंधळ )

**सभापती** : मी पुन्हा एकदा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि त्यांच्या सहकारी सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सकाळी नियम 289 खाली दिलेल्या प्रस्तावावर मी माझे रूलिंग येथे त्याचवेळी दिलेले आहे. तो प्रस्ताव मी स्वीकारला नाही. मात्र नियम 97 खाली चर्चा दिली होती. तुम्ही त्यावेळीच त्यावर मतदान मागितले असते तर मी ते दिले असते. पण त्यावेळी आपण कोणी तशी मागणी केली नाही. .... तुम्ही जागरूक राहिला नाहीत. .. आपण जागरूक का राहिला नाहीत ? ....

( गोंधळ )

सभागृहाची बैठक मी 20 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

सभागृहाची बैठक दुपारी 2.39 वाजता 20 मिनिटांसाठी स्थगित झाली.

( यानंतर श्री.सरफरे ....जीजी 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**औचित्याच्या मुद्दयासंबंधी**

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. संसदीय लोकशाहीमध्ये कोणत्याही विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे ही बाब सर्वांना मान्य आहे. परंतु या सदनाची गरिमा, प्रतिष्ठा राखण्याचे काम सुध्दा सर्व माननीय सदस्यांचे आहे. त्या दृष्टीकोनातून आज जो सभागृहामध्ये प्रकार घडला आहे तो अत्यंत धक्कादायक आहे. विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपल्या आसनाकडे येऊन त्यांनी आपल्याला धमकावण्याच्या दृष्टीने आपल्याकडे अंगुली निर्देश केला. या प्रकारामधून आपण लोकांना कोणता संदेश देत आहोत? हा जो घडलेला प्रकार आजचा नाही तर हे प्रकार कायम घडत आहेत. गेल्या अधिवेशनामध्ये सभागृहामध्ये अशाच प्रकारचा विषय उपस्थित झाल्यानंतर आपल्याला बाहेर जाऊन अडविण्यात आले. त्यामुळे हा प्रकार निषेधार्ह आहे. म्हणून माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना ताबडतोब निलंबित करण्यात यावे अशी मी मागणी करतो. आणि माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी तसा प्रस्ताव सभागृहापुढे आणावा अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. सावंत यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये अनेक प्रसंग येतात त्यावेळी सभागृहामध्ये प्रक्षोभक भावना तयार होते. माझी सभागृहाला एवढीच विनंती आहे की, ज्यावेळी नियम 289 खाली माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव दिला. त्या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनीही आपले विचार मांडले. आणि विचार मांडीत असतांना नियम 289 अन्वये प्रस्ताव कसा होतो हे सांगितले. त्यानंतर माझा निर्णय देण्याअगोदर मी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारले की, याबाबतीत आपले काय मत आहे? तेव्हा त्यांनी सांगितले की, या विषयावर चर्चा झाली पाहिजे. परंतु ती कधी होणार, कशी होणार यासंबंधी आपण निर्णय घ्यावा. त्यानंतर मी निर्णय घेतला आणि आपणास सांगितले की, हा प्रस्ताव नियम 289 खाली बसत नाही. ही चर्चा अत्यंत महत्वाची आहे, अत्यंत जीवाभावाची आहे. दुर्दैवाने राज्यामध्ये ज्या आत्महत्त्या झाल्या आहेत किंवा अन्य गोष्टी झाल्या आहेत, त्याबाबतीत मी नेहमी नियम 97 अन्वये चर्चा करण्यास परवानगी देतो. त्यामुळे माननीय विरोधी पक्षनेते किंवा अन्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

कुणीही याबाबतीत मत विभाजन मागितले असते तर त्याबाबतीत मी त्यांचा आदर केला असता. मी आपला सातत्याने आदर करतो. तेव्हा त्या विषयावरील माझा निर्णय मी पूर्ण केला. माझा निर्णय पूर्ण झाल्यानंतर मी सांगितले की, कार्यक्रम प्रत्रिकेवरील सर्व कामकाज पूर्ण झाल्यास किंवा चार वाजता नियम 97 अन्वये या महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित करण्यास मी परवानगी देत आहे असा माझ ा निर्णय मी दिलेला आहे.

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही याठिकाणी स्थगन प्रस्तावाची सूचना दिली. त्यावर आम्ही आमचे वक्तव्य केले. ते केल्यानंतर माननीय मुख्यमंत्री बोलले. त्यानंतर सभापती महोदय, आपण बोलावयास सुरुवात केली आणि आपण नियम 23 चा उल्लेख केला. आणि आपण आम्हाला सांगितले की, आम्ही मत विभाजनाची मागणी केली नाही. सभापती महोदय, आम्हाला मत विभाजन मागण्याची आवश्यकता नाही. आपण निर्णय देतांना नियम 23 याठिकाणी कोट केला. त्यामध्ये असे म्हटले आहे की,

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरू....

"(1) ज्याबाबतीत विधानपरिषदेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबींचा निर्णय, सभापती एखाद्या सदस्याने मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील." महोदय, आपण तसा प्रस्ताव मताला टाकावयास पाहिजे होता. आम्ही तशी मागणी करण्याची गरजच नाही. कारण नियम 289 खाली चर्चा व्हायला पाहिजे, असा आमचा आग्रह आहे. नियम कोट केला, त्याप्रमाणे आपण प्रस्ताव मतास टाकला नाही. आपण 97 अन्वये चर्चा जाहीर केली. नियम 97 अन्वये जाहीर केलेल्या चर्चेला आम्ही मान्यता दिलेली नाही. त्याचबरोबर दुसऱ्या कोणीही अशा प्रकारचा प्रस्ताव दिलेला नाही. तरीही नियम 97 अन्वये चर्चा होणार असेल तर ती चर्चा नियमबाह्य होणार आहे. सभापती महोदय, आपण सर्वोच्च पदावर बसलेले आहात. सर्वोच्च पदाच्या माध्यमातून अशा प्रकारचा चुकीचा मेसेज जाऊ नये. विधान परिषद नियमाला धरूनच चर्चा व्हायला पाहिजे. आपण चुकीचा निर्णय केला तर या सभागृहाची शान रहाणार नाही. आपण म्हणाला की, मी किंवा सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी प्रस्ताव मताला टाकण्याची मागणी करायला पाहिजे होती. परंतु नियम 23 मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, सभापती महोद

यांनी हा प्रस्ताव मताला टाकावा आणि निर्णय करावा. त्याप्रमाणे प्रस्ताव मताला टाकलेला नाही. ही गल्लत झालेली आहे. 97 अन्वये चर्चा आम्हाला मान्य नाही. तसा प्रस्ताव कोणाही सदस्यांनी दिलेला नाही, त्यामुळे त्या प्रस्तावावर चर्चा होऊ शकत नाही. आम्ही 289 अन्वये दिलेला प्रस्ताव मताला टाकला नाही. सभागृहामध्ये कोणी वेगळा प्रस्ताव दिला असेल तर त्यावर चर्चा करा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी आपल्यासमोर दोन-तीन नियम सांगून त्यावर विश्लेषण केलेले आहे. सभापती महोदय, आपल्या बोलण्यामध्ये असा उल्लेख आला की, आम्ही मतदानाची मागणी केली नाही. मतदानाची मागणी केव्हा करायला पाहिजे, याबाबत नियम 23 असो की, नियम 289 खाली असो, त्याबाबतचा निर्णय घेण्याची जबाबदारी ही पीठासीन अधिकाऱ्यांची आहे, असे म्हटलेले आहे. निर्णय घेताना तो मतदानाने घ्यायचा की कसा घ्यायचा हा निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार पीठासीन अधिकाऱ्यांचा आहे. नियम 23 मध्ये उल्लेख केलेला आहे की, मतदान घेऊन निर्णय व्हायला पाहिजे. परंतु या सदनामध्ये मतदान झालेच नाही. तेव्हापासून आमचा आग्रह आहे की, आम्हाला 97 खाली चर्चा नको. आपण

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

97 खाली चर्चा घेण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांशी विचारणा केली असली आणि त्यांनी त्यास होकार दिला असला तरी त्याप्रमाणे अधिकृतपणाने प्रस्ताव आलेला नाही. विरोधी पक्षातर्फे नियम 289 अन्वये प्रस्ताव आलेला आहे. आम्ही ज्यावेळेला अशाप्रकारची आयुधे वापरतो, त्यावेळेला त्यामागे निश्चितपणाने एक विचार असतो, तो विचार प्रत्यक्ष कृतीत यावा हा या मागचा उद्देश असतो. म्हणून आम्ही सर्व विरोधी पक्षांनी अशाप्रकारचे आयुध वापरले. त्या प्रस्तावावर विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या सह्या आहेत. या ठिकाणी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.भुजबळ साहेबांनी मधेच उभे राहून असे भाष्य केले की, आता सदनासमोरील काम संपलेले आहे, त्यामुळे आता दुसरे कामकाज होऊ शकत नाही. कॅबीनेट दर्जाचे मंत्री अशाप्रकारचे स्टेटमेंट कसे काय करतात हे मला समजत नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

जर सदनासमोरचे काम संपले असेल आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणे नियम 97 खाली कोणतीही चर्चा सुरु व्हावयाची असेल तर त्याला सुध्दा काही नियम आहेत. त्या नियमांची पूर्तता झाली काय ? त्या नियमाप्रमाणे आपले काम चालले आहे काय ? हे पाहण्याची जबाबदारी सन्माननीय मंत्रिमहोदयांची होती. परंतु तशी कोणतीही पूर्तता झालेली नाही. कोणाचाही प्रस्ताव नाही. लेखी किंवा तोंडी प्रस्ताव नाही. पीठासीन अधिकाऱ्यांनी या नियम 97 बद्दल कोणताही खुलासा केलेला नाही. एकदम चर्चेला कशी सुरुवात होणार ? हा प्रश्न आमच्यासमोर होता. हे सगळे कामकाज असेच ठेवून फक्त या ठिकाणी येऊन नियम 97 अन्वये चर्चा करावयाची आहे अशा घोषणा केल्या जात होत्या. त्यावरुन हा संपूर्ण गोंधळ या सदनामध्ये चालू होता. आम्ही त्याला विरोध करीत होतो आणि सत्ताधारी पक्ष शांतपणे ऐकत होता. मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, आताच सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी या ठिकाणी उभे राहून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाची मागणी केली. निलंबन कशासाठी ? आपण त्या ठिकाणी उपस्थित होता आणि आपण सांगितले होते की, मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाची मागणी करणार आहे. हा तुमचा अधिकार आहे. कोणाला निलंबित करावयाचे, कोणाला सभागृहाच्या बाहेर काढावयाचे, कोणाबद्दल निंदा करणारा प्रस्ताव आणावयाचा हा तुमचा अधिकार आहे. हे सगळे जरी मान्य केले तरी शेवटी या सभागृहाची प्रतिष्ठा अशा प्रकारचा प्रस्ताव आणण्यामध्ये नसते. ही प्रतिष्ठा सांभाळावयाची असेल तर या सदनामध्ये काम करणाऱ्या प्रत्येकाने प्रतिष्ठा सांभाळावयास पाहिजे. शक्यतोवर आमच्याकडून ही प्रतिष्ठा सांभाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. जी वैधानिक आयुधे आहेत तीच वापरुन आम्ही कामकाजामध्ये भाग घेत आहोत.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता मला उद्देशून सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी असे सांगितले की, सदनाची मर्यादा राखणे हे सर्वांचे काम आहे. परंतु आपल्याकडे येऊन जणू काही हल्ला करणे ही सदनाची मर्यादा होऊ शकत नाही.

श्री. दिवाकर रावते : हल्ला कशाला म्हणतात ते सांगावे लागेल. आम्ही हल्ला केला काय ? आपण ते शब्द मागे घ्यावेत. आम्ही कोठे हल्ला केला ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**सभापती** : सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी कृपया खाली बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपले शब्द मागे घ्यावेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत हे सैन्य दलातून आलेले असल्यामुळे त्यांना हल्ला आणि बचाव या दोनच गोष्टी कळतात, अन्य गोष्टी कळत नाहीत असा आम्ही अर्थ लावावयाचा काय ?

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये सुध्दा...

**सभापती** : मी आपल्याला परवानगी दिलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सगळ्या प्रकरणामध्ये नको ते विषय या ठिकाणी पुढे यावयास लागले. पीठासीन अधिकारी आणि आपला अवमान करण्याचा कोणत्याही सदस्याचा उद्देश नाही. आमच्यावर अन्याय कसा होतो हे सांगण्याचा त्या पाठीमागचा उद्देश होता. मोठ्या आवाजामध्ये ती गोष्ट सांगितली जात होती. याच्या पलीकडे कोणताही अपशब्द वापरलेला नाही. माझी आपल्याला विनंती आहे. जो निर्णय घ्यावयाचा असेल तो आपण स्वत: घ्यावा. नियमानुसार निर्णय घ्यावा. त्यासाठी जे समर्थन द्यावयाचे ते आपणच द्यावे. त्यानंतर त्यावर आम्ही प्रतिक्रिया व्यक्त करु.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी वारंवार नियम 289 चा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, पारंपारिक पध्दतीने विरोधी पक्षातर्फे नियम 289 चा प्रस्ताव मांडला जातो. परंतु विरोधी पक्षाकडून 289 चा प्रस्ताव यावयास पाहिजे असे यामध्ये म्हटलेले नाही. नियम 289 मध्ये "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने" असा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. बरवड 14:55

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

याचा अर्थ असा की, सभापतींनी त्यांना परवानगी दिली पाहिजे. मी नियम 289 वाचून दाखवितो. "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करताना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल."

आपण घटनाक्रम पहावा. "शेतक-यांच्या आत्महत्या" हा विषय अत्यंत गंभीर आहे. या प्रश्नावर विरोधी पक्ष जेवढा गंभीर आहे तेवढाच सत्ताधारी पक्ष देखील गंभीर आहे. माननीय सभापतींनी या ठिकाणी नियम 289 अन्वये चर्चा न घेता ती नियम 97 अन्वये घ्यावी असा निर्णय दिला. नियम 97मध्ये असे म्हटलेले आहे की, "निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या एखाद्या बाबीवर चर्चा उपस्थित करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही सदस्यास, ज्या बाबीसंबंधी चर्चा उपस्थित करावयाची असेल ती बाब स्पष्टपणे व नेमकेपणाने निर्दिष्ट करणारी लेखी सूचना सचिवांकडे देता येईल." त्याप्रमाणे सूचना दिलेली आहे. नियम 289 चा प्रस्ताव मान्य केला नसल्यामुळे नियम 97 अन्वये चर्चा करण्याचे निदेश माननीय सभापतींनी दिलेले आहेत. त्यांनी दिलेले निदेश कायद्याला आणि नियमाला धरुन आहेत.

श्री. छगन भुजबळ : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेल्या मताशी मी सहमत आहे. प्रस्ताव मतास टाकून निर्णय दिला पाहिजे असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे आहे. नियम 23मध्ये असे म्हटलेले आहे की, " ज्या बाबतीत विधानपरिषदेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबींचा निर्णय, सभापती एखाद्या सदस्याने मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील." नियम 289 अन्वये प्रस्तावास संमती दिलेली नसल्यामुळे विधानपरिषदेच्या निर्णयाची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : प्रस्ताव मांडण्यास संमती दिली....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

श्री. छगन भुजबळ : नियम 289 हा प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना तसेच सभागृहापुढे असलेले अन्य कामकाज बाजूला ठेवून चर्चा घेण्यासंबंधीचा आहे. सभागृहापुढील कामकाज बाजूला ठेवून चर्चा घडवून आणण्यास माननीय सभापतींनी मान्यता दिली नाही आणि त्यानंतर सभागृहापुढील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ....)

कामकाज करण्यात आले. माननीय सभापतींनी नियम 97 अन्वये चर्चा घेण्याचे ठरविले आणि तसे ठरविण्याचा अधिकार माननीय सभापतींना आहे. नियम 25 मध्ये असे म्हटलेले आहे की, "सभापतींना, त्यांच्या मते नियमांस अनुसरुन नसेल असा प्रस्ताव सुधारता येईल किंवा त्यास परवानगी नाकारता येईल." हा त्यांचा अधिकार आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ ..........

त्या अधिकाराचा त्यांनी वापर केलेला आहे आणि त्या मुद्यावर त्यांनी सांगितले की, नियम 97 खाली प्रस्ताव मांडावा. त्यानुसार आता अधिक अमूल्य वेळ वाया न घालविता चर्चा सुरु करावी. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी शेतकऱ्यांसाठी सांत्वन दिंडी काढली होती. त्या सगळयांची दु:खे त्यांना मांडता येतील. माननीय सभापतींनी पूर्णपणे नियमाला अनुसरुन कामकाज केले आहे. नियम 25 अन्वये त्यांनी तुमचा प्रस्ताव अमान्य केला असून नियम 97 अन्वये प्रस्ताव मान्य केला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : नियम 25 अन्वये मान्य केलेला नाही, नियम 23 अन्वये मान्य केल्याचे रेकॉर्डवर आहे.

श्री.छगन भुजबळ : नियम 23 प्रमाणे जर आवश्यकता असेल तर मतदान घेता येईल. त्यांनी ठरविले की, मतदानाची आवश्यकता नाही. त्यामुळे तो प्रश्न मिटला असून त्यांनी नियम 25 नुसार प्रस्ताव मान्य केला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये वैधानिक कामकाज करीत असताना तुमच्याकडून आमचा हक्क मागणे हा आमचा वैधानिक हक्क आहे. त्याकरीता आग्रह धरणे हा आमचा वैधानिक मुद्दा आहे. या सदनामध्ये हातवारे केल्यास सदस्यत्व रद्द करण्याची प्रथा आहे म्हणून मी हाताची घडी घालून उभा आहे. सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांच्याकडून शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्ततेबद्दल माझे सदस्यत्व रद्द होणार असेल तर मी स्वागतच करेन. हेच मी माननीय सभापतींना सांगितले.

माननीय सभापती महोदय, आता शेतकऱ्यांच्या आत्महत्यांबद्दल तुम्हाला आणि सरकारला हात दाखविण्याचे ठरविले आहे. माननीय सभापती महोदय, मी आपल्याला एवढेच म्हणालो, आमच्या प्रस्तावाला आपण संमती दिली, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव मांडला आणि त्यानंतर नियम असे सांगतो की, त्या नियमाप्रमाणे मांडलेल्या प्रस्तावाला या सदनाची संमती घ्यावी. ती संमती घेतल्यानंतर जी संमती असेल त्याप्रमाणे कामकाज करावे असा मला नियमाचा अर्थ समजला. त्यानंतर नियम 23 प्रमाणे आपण मतदानाचा विषय काढला त्याबद्दलही खंडन झालेले आहे. या सदनामध्ये नियम 97 अन्वये चर्चेची कोणीही मागणी केलेली नव्हती. वैधानिक आयुधे वापरुन सरकारला नामोहरम करणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. ते हसत खेळत झेलून त्याला परतावून





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ 15:20

श्री.दिवाकर रावते..........

लावणे हे सरकारचे मर्दुमकीचे काम समजले जाते. परंतु सरकार हे बॅकफूटवर जाणार असेल, घाबरले असेल, अशा पध्दतीने चर्चा आमच्या अंगावर येणार असेल तर सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे सांगितले त्याचे मी स्वागत करतो. सरकारला या प्रश्नाची चिंता आहे मग आपण हा प्रस्ताव संमत करुन चर्चेला घेतला असता तर शेतकऱ्यांना वाटले असते की, विरोधी पक्ष आपले काम करीत आहे आणि सरकार आपल्याकडे सहानुभूतीने पहात आहे अशी चांगली भूमिका, चांगला संदेश या ज्येष्ठ सभागृहातून गेला असता. परंतु तो चांगला संदेश कळविण्याला आपण मुकले आहात. निर्णय घेण्याकरीता ज्यांच्याकडे सोपविले त्यांनी तो वेळेवर घेतला नाही. मी आपल्याकडे सतत ओरडून सांगत होतो, प्रस्ताव नाकारला त्याबद्दल आमची तक्रार नाही. तो आपला अधिकार आहे. परंतु आमच्यावर कृपा करुन नियम 97 अन्वये चर्चा लादण्याचे काम करु नका. आपण आम्हाला न्याय द्या, संरक्षण द्या. सत्तारुढ पक्षाच्या बाजूने काम करीत आहात अशी भूमिका, वातावरण निर्माण होता कामा नये असे मी आपल्याला वारंवार याच शब्दात ओरडून सांगत होतो. आपण नियमाचे पुस्तक घेऊन सांगितले. मी सांगितले, माझ्या भावनांचा अतिरेक आपल्याविरुध्द, सदनाविरुध्द नाही. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्ततेबाबत ज्या भावना आहेत त्यासंबंधी आमची अडवणूक होत असेल तर आम्ही सदनात बसायचे कशासाठी? म्हणून मी आपल्याशी अत्यंत आक्रमकपणे वागलो. भविष्यात शेतकऱ्यांच्या विषयावर अशाप्रकारे आमची भावना होणार असेल तर हे आक्रमकता आमच्यामध्ये कायम राहणार आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, आम्हाला कोणाला मारहाण करावयाची नाही किंवा कोणाची निंदानालस्ती करावयाची नाही तसेच कोणाची टिंगलटवाळीही करावयाची नाही. आम्हाला केवळ या प्रश्नाच्या निमित्ताने वाचा फोडण्याचे काम करावयाचे आहे. आम्हाला कोणाची अडवणूक करावयाची नाही, कोणाची अडवणूक करावी अशी आमची इच्छा देखील नाही. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात आमच्या भावना अतिशय तीव्र आहेत. आपण ज्या सर्वोच्च आसनावर बसला आहात त्या आसनाचा मी मागेही कधी अनादर केला नाही आणि यापुढील काळात सुध्दा अनादर करणार नाही. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे आम्हाला नियम 97 अन्वये चर्चा करावयाची नसून आम्हाला नियम 289 अन्वये चर्चा करावयाची आहे. नियम 289 अन्वये चर्चा करण्याची आम्हाला परवानगी मिळाली तर आम्ही सत्ताधारी पक्षाला नामोहरम केल्याशिवाय राहणार नाही. सत्ताधारी पक्षाला नामोहरम करण्याची संधी आपण आमच्याकडून हिरूवन घेऊ नये, नियम 289 अन्वये चर्चा करण्याचा आमचा अधिकार आपण हिरावून घेऊ नये या अपेक्षेनेच आम्ही आपल्याकडे पाहतो आहे. या विषयाच्या संदर्भात आमच्या भावना अतिशय तीव्र आहेत, आम्ही आपला नेहमीच आदर करीत आलेलो आहे. त्यामुळे नियम 289 अन्वये चर्चा करण्याचा आमचा अधिकार आपण अबाधित ठेवावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय छगन भुजबळ साहेबांनी नियम 289 ची छाननी केलेली आहे. माननीय सभापती महोदयांनी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना स्थगन प्रस्ताव मांडण्याची संमती दिली होती व त्यानुसार माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी स्थगन प्रस्ताव मांडला होता. विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावाला माननीय सभापती महोदयांनी अनुमती देखील दिली होती. या प्रस्तावास माननीय सभापती महोदय संमती देऊ शकतात किंवा हा प्रस्ताव मतास टाकून त्यास संमती देऊ शकतात. या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी नियम 23 चा उल्लेख केलेला आहे. नियम 23 मध्ये असे म्हटले आहे की, "ज्या बाबतीत विधानपरिषदेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबींचा निर्णय, सभापती एखाद्या सदस्यांने मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील." परंतु हा प्रस्ताव मतास टाकला गेला नाही. नियम 23 नंतर या ठिकाणी नियम 25 चा देखील उल्लेख करण्यात आलेला आहे. नियम 25 मध्ये म्हटले आहे की,

......2

"सभापतींना, त्यांच्या मते नियमांस अनुसरुन नसेल असा प्रस्ताव सुधारता येईल किंवा त्यास परवानगी नाकारता येईल." आम्ही आमचा प्रस्ताव नियमानुसार दिलेला असल्यामुळे हा प्रस्ताव सुधारण्याची जबाबदारी माननीय सभापती महोदयांवर येत नाही. सुरुवातीस आपण हा प्रस्ताव मतास टाकू शकला असता. प्रस्ताव मतास टाकल्यानंतर तो फेटाळला असता तर आमचे काही म्हणणे नव्हते. परंतु सुरुवातील प्रस्ताव मतास टाकण्यात आला नाही. त्यामुळे आमचा आग्रह आहे की, या प्रस्तावावर 289 अन्वयेच चर्चा व्हावयास पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, विरोधी पक्षाने सांगितले आहे की, आम्ही नियम 289 अन्वयेच प्रस्ताव मांडलेला आहे. ज्यावेळेस आपण नियम 289, नियम 101 किंवा 97 अन्वये प्रस्तावाची नोटीस देतो तेव्हा ही नोटीस दिल्यानंतर माननीय सभापती महोदय त्यांचे म्हणणे ऐकून घेत असतात. म्हणणे ऐकणे म्हणजे प्रस्ताव मांडणे असा त्याचा अर्थ होत नाही. हा विषय नियम 289 मध्ये कसा बसतो हे आपण सांगितलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्करराव जाधव..........

या प्रश्नाच्या बाबतीत सरकारचा प्रत्यक्ष संबंध कसा येतो हे त्यांचे म्हणणे ऐकून घेणे म्हणजे तो प्रस्ताव मांडला असे होत नाही. माननीय सभापतींनी फक्त त्यांचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांना नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडू दिला. हे त्यांचे म्हणणे चुकीचे आहे. माननीय सभापतींनी प्रस्ताव स्वीकारल्यानंतर तो मांडला जातो. त्यांनी प्रस्ताव मांडलेला नाही. माननीय सभापतींनी फक्त नियम 289 अन्वये प्रस्ताव कसा होतो हे ऐकून घेतलेले आहे. नियम 289 प्रस्तावास मान्यता दिलेली नाही. म्हणून त्यांनी नियम 97 अन्वये चर्चा करण्याचा दिलेला निर्णय योग्य आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.छगन भुजबळ असे म्हणाले की, आपल्या विशेषाधिकारात तो प्रस्ताव नाकारता येतो. जर प्रस्ताव त्या नियमाखाली मांडला नाही, तर मग दुसऱ्या नियमाखाली परवानगी कशाला देता ? Is there any anomaly ? नंतर त्यांनी नियम 25 वाचून दाखविला. पण त्याच नियमाच्या पोटकलम (2) मध्ये असे म्हटलेले आहे की, " सभापतींना कोणत्याही प्रस्तावात किंवा प्रस्तावाच्या भागाला जो राज्य शासनाचा जिच्याशी मुख्यत्वेकरुन संबंध नाही अशा बाबींविषयी आहे या मुद्यावर, परवानगी नाकारता येईल." राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या याचा राज्य शासनाशी संबंध नाही का ? जर हा विषय राज्य शासनाशी संबंधित नसेल तर तो प्रस्ताव आपणास नाकारता येईल. आपण नियम 97 खाली नियमाखाली परवानगी दिली तर तो विरोधाभास होईल. कारण नियम 97 असा आहे की, "निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या एखाद्या बाबींवर चर्चा उपस्थित करण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही सदस्यास, ज्या बाबीसंबंधी चर्चा उपस्थित करावयाची असेल तर बाब स्पष्टपणे व नेमकेपणाने निर्दिष्ट करणारी लेखी सूचना सचिवांकडे देता येईल."

तेव्हा नियम 25 आणि नियम 97 हे दोन्ही नियम परस्पर विसंगत आहेत.

( गोंधळ )

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, जर सदस्यांनी नियम 289 अन्वये सभागृहातील सर्व कामकाज बाजुला सारुन एका विषयावर चर्चा मागितली आणि माननीय सभापतींनी ती नियम 289 मधे बसत नसल्यामुळे नाकारली, तर नियम 289 खाली त्या विषयावर चर्चा होणार नाही. परंतु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...........

दुसऱ्या नियमाखाली चर्चा होणार की नाही ? सभापतींनी ही चर्चा नियम 97 खाली घेण्यास तयारी दर्शविली आहे आणि ते नियमाला धरुन आहे. परंतु तुम्हाला ते मान्य नाही याचा अर्थ विरोधकांना चर्चेमध्ये इंटरेस्ट नाही.

(गोंधळ )

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी "शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या" या विषयावर चर्चा करण्यासाठी प्रस्ताव दिला त्याबद्दल मला फार बरे वाटले. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख म्हणाले की, शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांमुळे समाजमन फार अस्वस्थ आहे. गेली दोन वर्षे मी या विषयावर सभागृहात आणि बाहेरही बोलत आहे. शेतकऱ्यांना सहा टक्के दराने कर्ज देण्याचे म्हटले जाते, केंद्र सरकार वेगळे म्हणते, राज्य सरकार वेगळे म्हणते, या सर्व प्रश्नांची तड सरकारकडून लावून घेणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित.. 15:35

श्री.यशवंतराव गडाख...

मला असे वाटते की, आत्महत्येचा प्रश्न याठिकाणी नियमांच्या चक्रव्यूहामध्ये अडकलेला दिसतो व त्या नियमांच्या चक्रव्यूहावर चर्चा चालू आहे. शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नावर चर्चा आपण सुरुच करीत नाही. म्हणून या विषयी कुठल्या नियमाखाली चर्चा घ्यावी, यावर वाद न घालता, जर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व माननीय मुख्यमंत्र्यांनी एकत्रित बसून या प्रश्नावर तोडगा काढला तर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा होऊ शकते. तसेच, विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असून या सभागृहाची गरिमा आहे. हे लक्षात घेऊन याठिकाणी आपल्यासमोर येऊन जे वर्तन करण्यात आले त्याबद्दल माझ्यासारख्या कार्यकर्त्याला खेद वाटतो. प्रश्नाची तीव्रता ठीक आहे, परंतु ते मांडण्याचे प्रकार हे वेगवेगळे आहेत व असतात. त्यासाठी आयुधे दिलेली आहेत. असे प्रकार पुन्हा होऊ नयेत याचीसुध्दा खबरदारी या सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांनी घेतली पाहिजे. आता या प्रश्नावर चर्चा करु करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी आता सन्माननीय सदस्य श्री.यशवंतरावजी गडाख यांनी जे विचार मांडले, त्यांच्या विचाराशी मी सहमत आहे. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी याठिकाणी सांगितले की, शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा न होता तांत्रिक मुद्यावर चर्चा होत आहे. जर नियम 289 चा प्रस्ताव आपल्याला मान्य करावयाचा नव्हता तर त्यापध्दतीने आपण तसे जाहीर करावयास पाहिजे होते. आपण तो प्रस्ताव मतास टाकून फेटाळायला हवा होता. दुसरे असे की, नियम 289 च्या प्रस्तावाचे कन्वर्हशन आपण नियम 97 मध्ये केले, त्याला आमची संमती नाही. आमची संमती न घेता आपण हा प्रस्ताव नियम 97 मध्ये कन्व्हेंट केला. 97 चा प्रस्ताव कोणीही दिलेला नाही. याठिकाणी नियमाप्रमाणे लेखी सूचना द्यावयास पाहिजे. परंतु कोणीही लेखी सूचना दिलेली नाही. आमचा नियम 289 चा प्रस्ताव अमान्य करताना नियम 97 खाली चुकीची चर्चा होईल. नियम 289 खाली आम्हाला राईट ऑफ रिप्लायचा अधिकार आहे, त्याखाली मतदानाचा अधिकार आहे. ज्यावेळी नियम 97 खाली चर्चा होते त्यावेळी ती विचारात घेण्यात यावी, असे असते. त्यावेळी आम्हाला आमच्या शंका-कुशंका विचारता येत नाही. त्यामुळे आमचे अधिकार बाधित राहण्याच्या दृष्टीने आम्हाला पुन्हा माननीय मुख्यमंत्र्यांकडून किंवा सरकारकडून खुलासा घेण्याच्या दृष्टीने आमचा अधिकार बाधित ठेऊन आम्ही नियम 289 खाली चर्चेची मागणी केलेली आहे. परंतु आमची मागणी आपण नाकारली. याठिकाणी नियम 23

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

चा उल्लेख करण्यात आला. त्याखालीही प्रस्ताव मताला टाकून तसे परिवर्तन करुन घ्यावयाचे असते, परंतु तेही झालेले नाही. नियम 97 च्या प्रस्तावाची सूचना नियमानुसार दिलेली नसेल तर त्यावर या सभागृहामध्ये चर्चा होऊ शकत नाही. आम्ही दिलेला नियम 289 चा प्रस्ताव असून तो नियम 97 खाली रुपांतरित करावा, यास आम्ही संमती दिलेली नाही, एवढेच माझे म्हणणे आहे.

**सभापती** : मी याबाबतीतील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. नियम 23 च्या अनुषंगाने याठिकाणी काही मुद्दे स्पष्ट करण्यात आले. नियम 23 (1) मध्ये असे म्हटले आहे की, "ज्या बाबतीत विधानपरिषदेच्या निर्णयाची आवश्यकता असेल अशा बाबींचा निर्णय, सभापती एखाद्या सदस्याने मांडलेला प्रस्ताव मतास टाकून करतील." पुढे भाग (2) मध्ये असे म्हटले आहे की, "पुढील शर्तीची पूर्तता करीत नसेल असा कोणताही प्रस्ताव स्वीकार्य असणार नाही :- (अ) तो स्पष्टपणे व नेमकेपणाने व्यक्त करण्यात येईल व त्यात एक निश्चित मुद्दा उपस्थित करण्यात येईल." मी मघाशीच सांगितले की, नियम 289 खाली जो प्रस्ताव दिलेला आहे, त्या प्रस्तावामध्ये वेगवेगळया 7 बाबी आहेत. त्यामुळे हा प्रस्ताव नियम 289 मध्ये बसत नाही. आपण प्रस्ताव दिल्यानंतर तो प्रस्ताव नियम 289 खाली का स्वीकारण्यात यावा, याबाबत आपण आपले मत मांडावे यासाठीच मी आपल्याला मघाशी परवानगी दिली होती.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

आणि ती परवानगी दिल्यानंतर या ठिकाणी ज्यावेळी 289 चा निर्णय होण्याच्या दृष्टीने भाष्य केले त्यावेळी असे सांगितले की, कामकाज पत्रिकेच्या अनुषंगाने कोणतीही बाब नाही. त्यामुळे नियम 289 खाली कोणताही नियम तहकूब करुन चर्चा करण्याची पध्दत नाही म्हणून त्याखाली मी परवानगी नाकारली. हा अतिशय महत्वाचा प्रस्ताव आहे, दोन्ही बाजुच्या दृष्टीने, राज्यातील शेतक-यांच्या दृष्टीने, त्यांच्या आत्महत्येच्या दृष्टीने या सभागृहामध्ये सखोल चर्चा व्हावी म्हणून नियम 97 खाली ही चर्चा व्हावी, म्हणून मी परवानगी दिलेली आहे. त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्षनेते किंवा विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मतविभाजन मागितले असेत तर ते मी दिले असते. नियम 97 ची चर्चा आम्ही स्वीकारली आणि त्यानंतर सांगितले की, 4 वाजता किंवा कामकाज संपल्यानंतर ही चर्चा सुरु होईल. माझा निर्णय आहे तो मी निश्चित केलेला आहे. सभागृहामध्ये आपल्या भावना व्यक्त करीत असतांना काही सन्माननीय सदस्यांनी ज्या व्यक्तिगत भावना व्यक्त केल्या त्या तपासून कामकाजातून काढून टाकणार आहे. मी निर्णय दिल्याप्रमाणे याबाबत नियम 97 खाली चर्चा होईल, आता ही सभागृहाची प्रॉपर्टी झालेली असल्यामुळे या प्रस्तावावर या सभागृहात चर्चा सुरु होईल. मी निर्णय दिलेला आहे. सर्वांचे याबाबतीतील मनोगत समजल्यानंतर मी नियमातील तरतुदी सांगून निर्णय दिलेला आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या

मु.शी.: राज्यात शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या या विषयावर श्री. भास्कर जाधव, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे माननीय सदस्य, श्री.भास्कर जाधव आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :

"राज्यातील बहुसंख्य भागात व विशेषत: विदर्भात व मराठवाडयात नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून हजारो शेतक-यांनी केलेल्या आत्महत्या "

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणावर शेतक-यांच्या आमहत्या होत असतांना आपण सुध्दा शेतक-यांचे नेते असल्यामुळे या महाराष्ट्रातील शेतक-यांच्या भावना जाणून, त्यांच्या व्यथा आणि दु:ख जाणून या चर्चेला परवानगी दिली त्याबद्दल मी सुरुवातीलाच आपले अभिनंदन करतो आणि मनापासून आपल्याला धन्यवाद देतो. हा विषय नियमाच्या मर्यादेत येऊ नये, सर्व सभागृहाने या चर्चेत सहभागी व्हावे, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनीही या चर्चेमध्ये सहभागी व्हावे, यासाठी अडीच तासाची चर्चा घ्यावी अशा प्रकारे विरोधी पक्षाची समजूत काढण्याचा प्रयत्न झ ाला. विरोधी पक्षाला शेतक-यांचे दु:ख कमी व्हावे या भावनेपेक्षा या विषयाचे भांडवल करण्यामध्ये फार मोठा आनंद आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही. विरोधी पक्षाचे वर्तन पाहिल्यानंतर हे शेतक-यांवरील प्रेम पुतनामावशीचे प्रेम आहे असे म्हटल्यावाचून राहवत नाही.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळ जाऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.भास्कर जाधव ........

सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण या प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. शेतक-यांच्या प्रती जी आस्था दाखविलेली आहे त्या भावनेतून सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घ्यावा. सभापती महोदय, आपण मला या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. विदर्भामध्ये खास करुन विदर्भातील सहा जिल्हयांमध्ये शेतक-यांच्या आत्महत्या जास्त प्रमाणात झालेल्या आहेत. याची नोंद केंद्र सरकारने, राज्य सरकारने आणि विविध स्तरावरच्या सामाजिक संघटनांनी घेतलेली आहे. केवळ शेतक-यांच्या प्रती असलेले प्रेम, शेतक-यांच्या प्रती असलेला कळवला, शेतक-यांच्या प्रती असलेली कणव म्हणून केंद्र सरकारने, राज्य सरकारने आणि विविध संघटनांनी याची नोंद घेतलेली आहे. विदर्भामध्ये अधिवेशन सुरु असतांना शेतक-यांच्या आत्महत्यांबद्दल सभागृहामध्ये चर्चा होत आहे. राज्य सरकार निश्चितपणे शेतक-यांच्या बाजूने चांगला निर्णय घेणार आहे. शेतक-यांना दिलासा मिळेल अशा प्रकारचा निर्णय हे सरकार घोषित करेल अशी मी खात्र देतो. सभापती महोदय, शेतक-यांचे काही प्रश्न आहेत. शेतक-यांना 6 टक्के व्याज दराने कर्ज मिळावे, लोडशेडींगचा प्रश्न आहे यासंदर्भात राज्य सरकार योग्य निर्णय घेईल अशा प्रकारची भावना मी व्यक्त करतो आणि आपण मला चर्चेला सुरुवात करण्यास परवानगी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन माननीय सभापतींशी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : अशा परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.47 ते 4.02 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर --- )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**पृ.शी.** : राज्यात शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या.

**मु.शी.** : राज्यात शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या या विषयावर श्री.भास्कर जाधव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.
(चर्चा पुढे सुरू..)

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मघाशी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात आली त्यावेळी मी या चर्चेत भाग घेण्यासाठी उभी राहिले होते ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे ...

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आज, आता सभागृहामध्ये जे वातावरण आहे ते सभागृह चालविण्यास योग्य आहे असे मला स्वत:ला तरी वाटत नाही. सभागृहापुढील आजचे जे कामकाज आहे ते मघाशीच संपलेले आहे केवळ विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या संबंधातील चर्चा पूर्ण व्हावयाची आहे. ही चर्चा सुरू झालेली आहे.... अर्थात आमच्या समोरची मंडळी 'ही चर्चा सुरूच झालेली नाही' असे म्हणतील पण आमचे म्हणणे आहे की, ही चर्चा सुरू झालेली आहे. तेव्हा आजचे हे कामकाज आपण येथेच थांबवावे आणि उद्या पुढे सुरू करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**उपसभापती** : आजची ही चर्चा मी येथेच संपवित आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, सभागृहाची विशेष बैठक उद्या सकाळी 10.30 वाजता सुरू होईल आणि नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरू होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 04 मिनिटांनी, गुरूवार, दिनांक 7 डिसेंबर 2006 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही